सुविचार

यदि हम आपनी प्रशंसा व ख्याति सुनकर फूले नहीं समाते, तो निन्दा व आपमान में हम सन्तुलित नहीं रह सकेंगे ।



विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ शनिवार दि. २० जूलै २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१५५ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# आपण चांगले काम केले आहे

## पंतप्रधान मोदींनी भाजप कार्यकर्त्यांशी साधला संवाद

मुंबई: पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गुरूवारी भाजपच्या मुख्यालयात कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या दरम्यान त्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवताना म्हटले की दु:खी का आहात आपण चांगले काम केले आहे.

पंतप्रधान मोदींनी कार्यकर्त्यांना म्हटले की आता आपल्याला पुढे पाहिले पाहिजे. त्यांनी कार्यकर्त्यांसोबत लोकसभा निवडणूक २०२४च्या अनुभवाबद्दलही चर्चा केली. या दरम्यान पंतप्रधानांनी भाजपाच्या संघर्षाच्या आठवणी ताज्या करत पक्ष कार्यकर्त्यांमध्ये जोश भरण्याचा प्रयत्न केला.

निवडणुकीत काम केलेल्या कार्यकर्त्यांची घेतली भेट या दरम्यान



पंतप्रधान मोदींनी लोकसभा निवडणुकीत काम केलेल्या पक्ष कार्यकर्त्यांची यावेळी भेट घेतली. पंतप्रधान मोदींनी भाजप कार्यालयात दोन तासांहून अधिक वेळ घालवला. या दरम्यान त्यांनी भाजपच्या कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचीही भेट घेतली. भाजपा

कार्यालयात पोहोचलेल्या पंतप्रधान मोदींचे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी स्वागत केले. २०१९च्या लोकसभा निवडणुकीनंतर पंतप्रधान मोदींनी पक्षाच्या मुख्यालयाचा दौरा केला होता आणि कार्यकर्त्यांची भेट घेतली होती.

कार्यकर्त्यांना दिला बूस्टर डोस लोकसभा निवडणूक २०२४मध्ये भाजपला पूर्ण बहुमत मिळालेले नव्हते. पक्षाला २४० जागांवरच समाधान मानावे लागले होते. या निवडणुकीबाबत भाजप कार्यकर्त्यांमध्ये निराशा पाहायला मिळाली होती. कार्यकर्त्यांशी बातचीत करताना पंतप्रधान मोदींनी त्यांचे कौतुक केले. ते म्हणाले तुमच्या मेहनतीत कोणतीच कसर नव्हती. त्यामुळे निकालाबाबत निराश होण्याची गरज नाही.

# क्रॉस वोटिंग करणाऱ्या पाच आमदारांवर कारवाईचे आदेश

नवी दिल्ली : विधानपरिषद निवडणुकीत क्रॉस वोटिंग करणा-या काँग्रेसच्या पाच आमदारांवर कारवाई करण्याचा निर्देश काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिले आहेत. त्यामुळे आता काँग्रेसने पक्षाविरोधात काम करणा-या आमदारांना कडक इशारा दिला आहे. कोणत्या आमदारांवर कारवाई होणार त्यांची नावंही समोर आली आहेत.

काँग्रेसकडून पाच आमदारांवर कारवाई होणार असली तरी इतर दोन आमदारांची पुन्हा चौकशी करण्याचे निर्देशही मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिले आहेत. दरम्यान कारवाई होणा-या आमदारमध्ये झिशान सिद्दीकी, सुलभा खोडके, हिरामण खोसकर, जितेश अंतापूरकर, मोहन हंबिर्डे यांचे नाव असल्याची माहिती मिळते आहे. नुकत्याच पार पडलेल्या १३ जागांसाठीच्या द्विवार्षिक विधान परिषद निवडणुकीत



महाविकास आघाडीचे उमेदवार शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांचा पराभव झाला होता. काँग्रेसच्या आमदारांनी त्यांना मते दिली नसल्याने त्यांचा पराभव झाल्याचे स्पष्ट झाले आहे. काँग्रेसची ही मते महायुतीच्या उमेदवारांना गेल्याचा दावा केला जात होता. दरम्यान, या निवडणुकीनंतर लगेचच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी संबंधितांवर कारवाईचा इशारा दिला होता. यासाठी त्यांनी दिल्लीला जाऊन पक्षश्रेष्ठींच्या कानावर हा सर्व प्रकार घातला आणि आमदरांवर कडक कारवाईची शिफारस केली होती. कारण यापूर्वी देखील विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या आमदारांनी क्रॉस वोटिंग केल्याने काँग्रेसचे पहिल्या पसंतीचे उमेदवार चंद्रकांत हंडोरे यांचा पराभव झाला होता.

# जगभरातील मायक्रोसॉफ्ट विंडोज क्रॅश

न्यूयॉर्क : जगभरातील संगणक आणि लॅपटॉप सध्या ब्लू स्क्रीन ऑफ डेथला (बीएसओडी) बळी पडत आहेत. प्रसिद्ध सायबर सुरक्षा कंपनी क्राउड स्ट्राईकने एक अपडेट सांगितली, ज्यानंतर एमएस विंडोज वर चालणारे सर्व संगणक आणि लॅपटॉप अचानक क्रॅश होत आहेत.

काम करत असताना लॅपटॉप अचानक बंद होत आहेत आणि त्यानंतर यूजर्सना निळा स्क्रीन दिसत आहे. स्क्रीनवर सांगितले जात आहे की तुमचा संगणक अडचणीत आहे आणि रीस्टार्ट करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेलाच ब्लू स्क्रीन ऑफ डेथ (बीएसओडी) म्हटले जात आहे. या समस्येमुळे जगभरातील मायक्रोसॉफ्ट विंडोजवर चालणारे लॅपटॉप आणि संगणक प्रभावित झाले आहेत. क्राउड स्ट्राईकने या प्रकरणाची दखल घेत समस्येची चौकशी सुरू केली आहे. क्राउड स्ट्राईकच्या प्रतिनिधीने एक विधान जारी केले आहे की विंडोज चालवणा-या मशीनवर बीएसओडी समस्या निर्माण झाली आहे. जर तुम्हाला तुमच्या कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपमध्ये ब्लू स्क्रीन ऑफ डेथ (बीएसओडी) ची समस्या येत असेल तर तुम्ही काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. लक्षात ठेवा की कोणत्याही परिस्थितीत आपण स्वत:हून या समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करू नये. तांत्रिक सूचना येण्याची वाट पहा. क्राउड स्ट्राईकसध्या या समस्येचे निराकरण करण्यासाठी काम करत आहे आणि लवकरच तुम्हाला अपडेट करेल.

जगभरात समस्या निर्माण

शुक्रवारी सकाळी क्लाउड सेवा विस्कळीत झाल्यामुळे जगभरातील अनेक भागात समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे विमान कंपन्यांच्या उड्डाणांवर परिणाम झाला आहे. यामुळे भारत आणि अमेरिकेसह अनेक देशांतील विमानांच्या उड्डाणांवर परिणाम झाला आहे.

तक्रारींची त्सुनामी अनेक युजर्स याबाबत तक्रार करत आहेत. या समस्येमुळे लाखो युजर्सवर मोठा परिणाम झाला आहे. बरेच युजर्स तक्रार करत आहेत की त्यांची सिस्टम एकतर बंद झाली आहे किंवा त्यांना ब्लू स्क्रीन समस्येचा सामना करावा लागत आहे. मोठ्या बँका, आंतरराष्ट्रीय विमान कंपन्या, जीमेल, ॲमेझॉन आणि इतर आपत्कालीन सेवांवर त्याचा परिणाम होत आहे.

# खेडकरांच्या मालकीच्या थर्मोव्हेरिटा कंपनीवर जप्ती

पिंपरी : वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. पूजा खेडकरांची आई मनोरमा खेडकर यांच्या नावावर असलेली कंपनी पिंपरी चिंचवड महानगर पालिकेकडून जप्त होण्याची शक्यता आहे. मनोरमा खेडकर यांच्या नावावर पिंपरी चिंचवडमध्ये थर्मोव्हेरिटा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे. या कंपनीवर पालिकेकडून जप्तीची कारवाई होणार आहे. या कंपनीने पालिकेचा कर बुडवला आहे. त्याप्रकरणी ही कारवाई होण्याची शक्यता आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील ज्योतिबानगर तळवडे येथे मनोरमा खेडकर यांची थर्मो व्हेरिटा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी आहे. या कंपनीने पिंपरी चिंचवड महापालिकेचे २ लाख ७७ हजार इतकं कर मागील दोन वर्षापासून बुडविला आहे. तसेच थर्मोव्हेरिटा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी खेडकर कुटुंबीयांनी रेड झोनमध्ये उभारली आहे. त्यामुळे खेडकर कुटुंबीयांची ही कंपनी देखील अनधिकृत असल्याचे शिक्कामोर्तब पिपरी-चिंचवड महापालिकेने केला आहे. पूजा खेडकर यांनी पिपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयातून अपंगत्वाचे प्रमाणपत्र घेण्यासाठी या कंपनीचा पत्ता आपले निवासस्थान म्हणून दाखवला होता. (पान ७ वर)

# मालती महारुद्रप्पा खेणी मातृशक्ती राष्ट्रीय पुरस्कार

सोलापूर : वाराणसी येथील श्रीकाशीमहापीठाकडून यावर्षीपासून पहिल्यांदाच एक लाख रुपयांचा 'श्रीमती मालती महारुद्रप्पा खेणी मातृशाक्ती राष्ट्रीय पुरस्कार' देण्यात येणार असल्याची माहिती डॉ. अनिल सर्जे यांनी पत्रकार परिषदेत दिली. श्री १००८ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावेळी श्रीकाशीपीठाचे नूतन जगद्गुरू श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांचे दिव्य सान्निध्य लाभणार आहे.



तर सुनीता कल्याणी (पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली आणि धर्मराज खेणी, निर्मला खेणी, धर्मराज काडादी यांची उपस्थिती असणार आहे. एक लाख रुपये रोख, रुद्राक्षमाळ, गौरवपत्र, शाल, श्रीफळ, रोप असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

भारतातील थोर उद्योगपती बाबासाहेब कल्याणी यांच्या सुविद्य पत्नी सुनीता कल्याणी यांनी या पुरस्कारासाठी निधी दिला आहे. सुनीता कल्याणी यांच्या मातोश्री मालती खेणी यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जाणार आहे. मातोश्री मालती या आपल्या आयुष्यात समाजातील प्रतिकूल परिस्थितीत जगणाऱ्या पण काही कर्तृत्व करू इच्छिणाऱ्या महिलांना मदत करीत असत. यासाठीच समाजातील एका कर्तृत्ववान महिलेला दरवर्षी हा पुरस्कार (पान ७ वर)

# खासगी शाळा आरटीई अंतर्गतच

मुंबई : खासगी विनाअनुदानित शाळांना आरटीई नियमांतून वगळण्यासाठी राज्य सरकारने काढलेला अध्यादेश शुक्रवार दि. १९ जुलै रोजी मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला असून राज्य सरकारला मोठा दणका देत फटकारले आहे.

वंचित आणि दुर्बळ घटकातील मुलांसाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया सरकारकडून राबवली जाते. मात्र यंदा राज्य शासनाने आरटीईच्या नियमात काही बदल केले, त्याबाबतचा अध्यादेश फेब्रुवारीत काढण्यात आला होता. मात्र हा अध्यादेश मुंबई उच्च न्यायालयाकडून रद्द करत राज्य सरकारला दणका दिला आहे. शालेय प्रवेशाबाबत अचानक अशाप्रकारे निर्णय घेणे घटनाबा असल्याचे उच्च न्यायालयाने म्हणत राज्य सरकारला फटकारले आहे. खासगी विनाअनुदानित शाळांना आरटीई प्रवेश प्रक्रियेतून वगळण्याबाबत ९ फेब्रुवारीला राज्य सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. राज्य सरकारने खासगी शाळांऐवजी वंचित घटकांतील मुलांना सरकारी



अनुदानित शाळेत प्रवेश घ्यावा यासाठी नियमांत बदल केले होते. पालकांकडून इंग्रजी माध्यमांतील खासगी शाळांना पसंती देण्यात येत होती त्यामुळे सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी सरकारने ९ फेब्रुवारीला खासगी विनाअनुदानित शाळांना वगळण्यासाठी अध्यादेश काढला होता.

सरकारच्या या निर्णयाविरोधात पालक संघटनांनी हायकोर्टात आव्हान दिले होते. मे महिन्यात या अध्यादेशाला स्थगिती देत हायकोर्टाने या प्रकरणावर सुनावणी घेतली होती. त्यात अंतिम निकाल सुनावताना न्या. देवेंद्रकुमार उपाध्ये यांच्या खंडपीठाने म्हटले की, राज्य सरकारने अचानकपणे आरटीई प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेणे हे घटनाबा आहे. कायद्यात रातोरात बदल करता येणार नाही त्यामुळे हा अध्यादेश आम्ही रद्द करतोय असे म्हटले. परंतु त्याचसोबत फेब्रुवारी ते मे या काळात खासगी शाळांनी आरटीईच्या राखीव जागांवर ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिले ते अबाधित राहतील त्या ढवळाढवळ करू नये असेही निर्देश हायकोर्टाने दिलासा दिला आहे. दरम्यान, आरटीई अंतर्गत शाळांच्या परिसरातील वंचित आणि दुर्बळ घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे खासगी शाळांनाही आणि राज्य सरकारलाही बंधनकारक राहील.

कोर्टात सरकारची भूमिका काय होती?

आरटीई प्रवेशात खासगी विनाअनुदानित शाळेत राखीव जागांपेक्षा अधिक अर्ज प्राप्त होत होते. खासगी शाळांना पालकांची पसंती असल्याने सरकारी शाळेत विद्यार्थ्यांची संख्या कमी होते. त्यामुळे सरकारकडून या शाळांवर होणारा कोट्यवधींचा खर्च वाया जात असल्याची (पान ७ वर)

# गडकिल्ल्यांवर दारू पिऊन जाल तर खबरदार: अजित पवार

सातारा : छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर केलेल्या शौर्याचे प्रतीक असलेली वाघनखे साता-यात ठेवण्यात आली आहेत. आज साता-यातील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या वाघनखांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान या कार्यक्रमादरम्यान बोलताना राज्यचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गड किल्ल्यांबद्दल मोठी घोषणा केली.



अजित पवार म्हणाले की, आजचा दिवस हा खूप महत्वाचा आहे, वाघनखांबाबत मागील अनेक दिवस चर्चा सुरू आहे. काही चागले घडत असेल तर काही जन टीका-टिप्पणी करतात, जे टीका करतात ते लंडनला गेले की कोहिनूर हिरा बघतात आणि वाघनखे बघतात. पण इथे आले की टीका करतात. ही वाघनखे प्रेरणादायी अशी वाघनखे आहेत. एकदा का होइना वाघनखे बघा, अफजल खानाचा कोथळा शिवाजी महाराज यांनी त्या वाघनखानी काढला असा सल्ला देखील अजित पावारांनी टीका करणा-यांना दिला.

अजिंक्य ता-याला १० कोटी दिले ते खर्च करा, जवळपास ५०० कोटी रुपये राज्य सरकारने उपलब्ध करून दिले आहेत. पुन्हा येणा-या सरकारमध्ये महायुतीचे सरकार आणावे लागेल, तर कायमच्या योजना आणल्या जातील. काही जण म्हणतात चुनावी जूमला आहे, अरे कशाचा जुमला? हे सरकार सर्व सामन्यासाठी काम करत आहे, अशा शब्दात अजित पवारांनी (पान ७ वर)

## विशालगड घटनेच्या निषेधार्थ दीड तास निदर्शने

लातूर:प्रतिनिधी:कोल्हापूर येथील विशालगडावर झालेल्या धार्मिक स्थळ नाससुधसप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच वाढत्या मॉब लिंचिंगच्या घटनांच्या निषेधार्थ सोशल डेमोक्रेटीक पार्टी ऑफ इंडिया, लातूरच्या वतीने दि. १९ जुलै रोजी दुपारी सुमारे दीड तास येथील महात्मा गांधी चौकात निदर्शने करण्यात आली.

विशालगडावर झालेल्या धार्मिक स्थळ नासधुस आणि हिंसेचा निषेध असो, कट्टरपंथीयांवर कठोर कारवाई करावी, जातीवाद मुर्दाबादमुर्दाबाद, जातीवाद नही सहेंगे नही सहेंगे.., मॉब लिचिंग मुर्दाबादमुर्दाबाद, हिंदूस्तान जिंदाबाद जिंदाबाद, असा घोषणा यावेळी देण्यात आल्या. विविध घोषणा आणि मागण्यांचे फलक आंदोलनकर्त्यांच्या हातात होते. त्यावर एनडीए सरकारमध्ये जातीयवादी हिंसाचार वाढतो आहे., मॉब लिंचिंगच्या घटनाही वाढत आहेत, विशालगडावरील धार्मिक, प्रार्थनास्थळावर हल्ला करणा-यांना कठोर कारवाई करावी, विरोधी पक्षाने धर्मनिरपेक्षेतेचे सोंग करु नये, अशा घोषणा आणि मागण्या फलकावर लिहीलेल्या होत्या. महात्मा गांधी चौकात सुमारे दीड तास चालेल्या या निदर्शनात मोठ्या प्रमाणात युवकांनी सहभाग घेत घटनेच्या निषेधार्थ घोषणा दिल्या. या आंदोलनामुळे वाहतूक खोळंबली होती. मोठा पोलीस बंदोबस्तही होता.

# औसा आडत असोसिएशन पदाधिकाऱ्यांचा राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती सोमवंशी यांच्या हस्ते सत्कार



औस: प्रतिनिधी औसा कृषी उत्पन्न बाजार समितीमधील आडत असोसिएशनची नवीन कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचा महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आडत असोसिएशनच्या अध्यक्षपदी शिवलिंगाप्पा औटी, उपाध्यक्षपदी गोविंद बापू दळवे, प्रा. फारूक शेख, सचिव पदी महेश जाधव, कोषाध्यक्षपदी परमेश्वर भोसले यांची निवड करण्यात आली आहे. औसा कृषी उत्पन्न बाजार समिती गेल्या दहा, पंधरा वर्षात अतिशय चांगली म्हणून जिल्हात नंबर तीनची बाजार समिती म्हणून नावलौकिक मिळवलेली आहे. अतिशय पारदर्शकपणे बाजार समितीचा कारभार असल्यामुळे येथील शेतकरी, अडते, व्यापारी, खरेदीदार, हमाल, गुमास्ता एका समन्वयाने काम करून शेतकऱ्याचे हित जपण्याचे काम करतात. त्यामुळे आडत असोसिएशन महत्त्वाची मोलाची भूमिका बजावते. या सत्कारावेळी शिवसेना शहर प्रमुख सुरेश भुरे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, बाजार समिती माजी उपसभापती किशोर जाधव, राजाभाऊ भणगे, राहुल साळुंके, शरणाप्पा सडू, विजयकुमार राचटे, सुरेश मुसळे, किशोर भोसले, बाबा यादव, विश्वराज औटी, महादू कुचमे आदी उपस्थित होते.

# साई मंदिरात देशमुखांच्या हस्ते आरती





**लातूर / प्रतिनिधी-** येथील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या विशालनगर भागातील श्री साईनाथ मंदिरात गुरुवारी माजी मंत्री, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याचे अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी दर्शन घेवून मनोभावे प्रार्थना केली. यावेळी त्यांच्या हस्ते साईनाथाची आरती करण्यात आली.

यावेळी जागृती शुगर इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, मांजरा आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद पवार, सतीश पाटील, वीरसेन भोसले, विकास देशमुख, शाहूराज पवार, शिवाजी कांबळे आदी मान्यवर, आणि भक्त गण उपस्थित होते. यावेळी श्री साई मंदिर संस्थानच्यावतीने मंदिर ट्रस्टींच्या हस्ते माजी मंत्री देशमुख यांचे शाल व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.



# श्री महादेव विद्यालयात दिशा प्रतिष्ठान लातूर तर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

वलांडी -देवणी तालुक्यातील धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गोरगरीब आर्थिक दृष्ट्या मागास गुणवंत होतकरूअशा तेलंगे सिद्धी परमेश्र्वर, बिरादार श्रावणी संतोष, सुवर्णकार समृद्धी विद्यासागर, पांचाळ श्रीनिवास धोंडीराम, बिरादार प्रणव शिवराज, सूर्यवंशी पायल माधव, पांचाळ भावना नागनाथ, पवार ऐश्र्वर्या मारुती, बिरादार प्रीती राजकुमार, दरेकर स्वाती संतोष, बिरादार सरस्वती बसवराज, पालापुरे मानव रवींद्र, बिरादार वेदिका राहुल, सुवर्णकार मयुरी विद्यासागर, बिरादार यश तुकाराम, पाटील भक्ती भाऊराव, बिरादार वैष्णवी सुनील, दंडवते सारिका पप्पू, बिरादार प्रीती विश्र्वनाथ, बिरादार संस्कृती बालाजी, राठोड अंजली अनिल, बोयणे श्रद्धा अंगद या विद्यार्थ्यांना वह्या, बॅग, टिफिन बॅग, डब्बा असे विविध शैक्षणिक साहित्य दिशा प्रतिष्ठान लातूरचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.अभिजितजी देशमुख व अध्यक्ष मा.श्री. सोनू डगवाले यांच्या तर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप दिनांक १८.०७.२०२४ वार गुरुवारी लातूर येथे करण्यात आले. श्री महादेव विद्यालय हे एक आदर्श विद्यालय आहे. तसेच आयएसओ मानांकन प्राप्त विद्यालय आहे. या विद्यालयाचे प्राचार्य महाराष्ट्र शासनाचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त रामलिंग मुळे व त्यांचे स्टॉफ यांनी गोरगरीब गुणवंत होतकरू विद्यार्थ्यांसाठी विविध योजना उपलब्ध करून देतात. त्यात विद्यार्थी दत्तक योजना, शुद्ध पाणी पिण्यासाठी आरओ प्लांट, मोफत सायकल योजना, पुस्तक वाटप, अशा विविध योजना विद्यालयाच्या वतीने व माजी विद्यार्थ्यांतर्फे राबवले जातात. शैक्षणिक साहित्याचे वाटप प्रसंगी प्राचार्य रामलिंग मुळे, मुसळे बी.एस., मोमले एम. पी., धडे आर.एस, झरीकुंटे आर. के., पवार बी.टी., हिंगेवार सर, श्रीनिवास मोरे, जाधव गोविंद आदि दिसत आहेत.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २020 वर उद्बोधन वर्गाचे आयोजन

देगलूर (प्रतिनिधी) : २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची पदवी स्तरावर अंमलबजावणी सुरू झाली असून विद्यार्थी - पालक तसेच शिक्षक वृंदांचे या धोरणाच्या बाबतीत योग्य उद्बोधन व्हावे या अनुषंगाने वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात विद्यार्थी- पालक, शिक्षक समन्वय समितीच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक २०२० या विषयावर उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले.

या उद्बोधन वर्गात प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने यांनी क्रेडिट सिस्टीम, अकॅडमीक बँक क्रेडिट, प्रात्यक्षिके, शिक्षकांचा कार्यभार इत्यादी बाबींवर प्रकाश टाकला. दुसरे मार्गदर्शक प्रा. दिलीप पस्तापुरे यांनी विषयाची निवड, शाखा बाह्य विषय (जेनेरिक इलेक्टिव्ह), भाषाविषयक कार्यप्रणाली, विषयनिहाय विविध सामाजिक - स्वयंसेवी संस्थांशी करावी लागणारे सामंजस्य करार, इत्यादी बाबींवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची आवश्यकता व महत्त्व प्रतिपादन करून या शैक्षणिक धोरणातून भारतीय शिक्षण व्यवस्था सशक्त होईल असा आशावाद व्यक्त केला. समिती समन्वयक प्रा. डॉ. मारोती बामणे यांनी प्रास्ताविकातून उद्बोधन वर्गाचा उद्देश कथन केला. या उद्बोधन वर्गात प्रमुख वक्त्यांच्या मार्गदर्शनानंतर संपन्न झालेल्या चर्चेतून विविध प्रश्नांची उकल झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ रवींद्र बेंबरे यांनी केले तर आभार डॉ. गंगाधर देशमुख यांनी मानले.



**आयुक्त मनपा साहेबांकडे आम्ही सार्वजनिक शौचालय ट्युशन एरिया व अशोक हॉटेल येथे बांधण्यात यावे यासाठी सामाजीक कार्यकर्ते श्री. पंकज देशमुख यांनी निवेदन दिलेले आहे.**

# बीएसएनएल सेवेवर येरोळकर संतापले!

**वारंवार केबल तुटण्याचे प्रकार घडतात. अत्यंत खराब सेवा दिली जाते. वीज पुरवठा खंडित झाला की, सेवा ठप्प होते**

**प्रशांत तांबोळकर**

शिरूरआनंतपाळ : जीओ एअरटेल व व्होडोफोन आयडीया कंपनीने फोनच्या नेटपॅकचे दर वाढविल्यामुळे अनेक ग्राहकांनी कुणी जुने सीम पोर्ट केले तर काही ग्राहकांनी बीएसएनएल चे नवीन सीम कार्ड घेतले आहेत. परंतु बीएसएनएलचे वारंवार केबल तुटण्याचे प्रकार घडत असुन अत्यंत खराब सेवा भारत संचार निगम कंपनी कडुन ग्राहकांना दिली जात आहे.

येरोळ येथील वीज पुरवठा खंडित झाला की, येरोळसह परिसरातील गावाची सेवा ठप्प होते. अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात आहे. सेवा देणारे व्हेंडर म्हणतात, ङ्गआमच्या हातात काही नाही.फ अस सांगतात.

खाजगी कंपनीने नेटचे दर २५ ते ३० टक्याने वाढविल्यामुळे शहरी भागासह ग्रामिण भागातील अनेक ग्राहकांनी इतर खाजगी कंपनीचे सीम बीएसएनएला पोर्ट केले असुन हजारो ग्राहकांनी बीएसएनएलचे नवीन सीम कार्ड वापरण्याला पसंती दिली आहे. सोशलमीडीयावर बीएसएनएल चे रिचार्ज स्वस्त असल्याची पोस्ट व व्हीडीओ व्हाटसअॅपवर फिरत असल्यामुळे व इतर कंपनीपेक्षा रिचार्ज कमी दरात असल्याने एक जुलै पासुन अनेकांनी इतर कंपनीचे कार्ड पोर्ट करणे व नवीन सीम घेण्यासाठी बीएसएनएलच्या सीम विक्रेत्याकडे गर्दी केली आहे. परंतु येरोळ येथील बीएसएनएलला टॉवर असुनही रेंज मिळत नाही. त्यामुळे भारत संचार निगमची सेवा घेणारे हजारो ग्राहक वैतागले आहेत,

एखादा आठवडा सेवा सुरळीत चालली की, लगेच अडचणी उद्भवतात. दररोज एक तास, तर कधी दोन तास इंटरनेट कनेक्शन बंद होते. बीएसएनएल कडून कधी केबल तुटते तर, कधी एक्स्चेंजकडून बंद असते सध्या मोबाईलवर मुख्यमंत्री बहिण लाडकी माझी या योजनेचे अॅपवर माहीती भरण्यासाठी बीएसएनएलच्या गायब होणाऱ्या नेटवर्क रेंजमुळे बऱ्याच वेळा अडचणी येतात. शिरूरआनंतपाळ येथील कार्यालयामधील अधिकारी ही जबाबदारी झटकून रिकामे होतात. तक्रार करण्यास कार्यालयात गेल्यास अधिकारी उपलब्ध नसतात. शुक्रवारी सकाळी सहा वाजल्या पासुन बंद पडलेला सर्व्हर हे वृत्त लिहीपर्यंत सुरु झालेला नव्हता. याकडे कोणताही अधिकारी लक्ष घालत नाही. त्यामुळे येरोळ येथील भारतीय स्टेट बॅंक, जिल्हा मध्यवर्ती बॅक महाईसेवा केंद्रामध्ये ऑनलाइन काम करतात, परंतु बीएसएनएलला रेंज नसल्यामुळे ग्राहकांची पंचाईत होत आहे. याची संबधीत अधिकाऱ्याने दखल घेऊन सेवा चांगली द्यावी अशी मागणी होत आहे.

# जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन

**लातूर/ प्रतिनिधी-** लातूर जिल्हा योगासन स्पोर्ट असोसिएशन तर्फे जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन केले आहे . अशी महिती असोसिएशन चे अध्यक्ष श्री विष्णूजी भुतडा व असोसिएशन चे सचिव अॅड. महादेव झुंजे पाटिल यांनी दिली . हि स्पर्धा शनिवारी दि.२७ रोजी लातूर जिल्हा क्रिडा संकुल येथील रूद्रा स्पोर्ट्स क्लब येथे होणार आहे .

या स्पर्धेच्या माध्यमातून योगासन मधील प्रतिभावंत खेळाडूचा शोध घेतला जाणार आहे . स्पर्धेत उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची राज्यस्तरीय संघात निवड केली जाणार आहे .मुला व मुलींच्या स्वतंत्र गटात होणाऱ्या स्पर्धेत सब ज्युनिअर, ज्युनिअर, सिनियर, सिनियर अ , सिनियर ब , सिनियर क अश्या सहा गटात विभागणी करण्यात आली आहे . पारंपरिक एकल, कलात्मक एकल व दुहेरी , तादाम्य दुहेरी अशा योगासनांच्या चार प्रकारात ही स्पर्धा होणार आहे . स्पर्धेच्या आधिक माहिती साठी स्पर्धा संयोजक श्री. महादेव झुंजे पाटिल( मो. नं ९४०३९७०५३५) व श्री. रामलिंग राजकुमार बिडवे (मो.नं ९०२१९३९६६४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन असोसिएशन चे अध्यक्ष श्री . विष्णूजी भुतडा( मो.नं ९७३००६९७०४) यांनी केले आहे.

# सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व

प्रार्थनेचे वैयक्तिक व सामुदायिक असे दोन प्रकार आहेत. वैयक्तिक प्रार्थना एकेका व्यक्तीने केलेल्या असतात परंतु त्या व्यक्तीसाठी वा समुदायासाठीही असू शकतात.

तसेच सामुदायिक प्रार्थनाही समुदायासाठी वा व्यक्तीसाठी असू शकतात. यहुदी, ख्रिस्ती व इस्लाम या धर्मांत सामुदायिक प्रार्थनेला अत्यंत महत्त्व आहे.

सामुदायिक प्रार्थनेमुळे बंधुत्व व सामाजिक ऐक्य निर्माण होते, याचे इस्लामी प्रार्थना हे उत्तम उदाहरण होय. प्रार्थना स्वतःसाठी न करता इतरांसाठी करण्याच्या कृतीतूनही मानवी नात्यांचे दृढीकरण होत असते. प्रार्थनेचे खाजगी व सार्वजनिक असेही दोन प्रकार आहेत.

प्रार्थना केव्हा व किती वेळा करावी, याविषयी विविध नियम आढळतात. नित्य व नैमित्तिक अशा दोन प्रकारच्या प्रार्थना असतात. इस्लाममध्ये प्रत्येकाने दररोज पाच वेळा प्रार्थना नमाज करावी, असा नियम आहे. प्राचीन यहुदी लोक दिवसातून तीन वेळा प्रार्थना करीत आणि प्रारंभीच्या ख्रिस्ती लोकांनीही ती परंपरा चालू ठेवली होती. हिंदूंमध्ये प्रामुख्याने पूजेच्या वेळी प्रार्थना केली जाते. विविध धर्मांतून शुक्रवार, शनिवार, रविवार इ. विशिष्ट दिवस प्रार्थनेचे म्हणून मानले जातात.

जन्म, नामकरण, यौवनप्राप्ती, विवाह, मृत्यू, पेरणी, सुगी, शिकार, प्रवास, युद्ध इ. प्रसंगी प्रार्थना म्हटल्या जातात. देवतेला बळी अर्पण करताना तसेच कोणत्याही कामाला प्रारंभ करताना इष्ट देवतेची प्रार्थना म्हटली जाते. देवाचा अनुग्रह रहावा, संकटनाश व्हावा, कार्यसिद्धी व्हावी, यश प्राप्त व्हावे, म्हणून कार्यारंभी, ग्रंथारंभी प्रार्थना करूनच कार्यास किंवा ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करतात.

युद्धात यश प्राप्त व्हावे, शत्रूचा पराभव व्हावा म्हणून सामुदायिक प्रार्थना होतात. ही गोष्ट पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धाच्या इतिहासात नमूद केली आहे. मंदिर, राजवाडा, घर इ. ठिकाणी प्रार्थना म्हटल्या जातात. काही आफ्रिकी जमातींत प्रत्येक खेड्यात एक प्रार्थनावृक्ष असतो. लोक त्याच्याखाली जमून प्रार्थना करतात. प्रार्थनांच्या निमित्ताने झालेली भावकाव्ये हा मानवी संस्कृतीचा एक मोठा ठेवा आहे. प्रार्थनेमुळे माणसाला आपल्याच मनाच्या गूढ सामर्थ्याची अनुभूती येते, प्रार्थना हे धर्माचे हृदय आहे, प्रार्थनेला श्वासोच्छ्वासाइतके महत्त्व आहे, प्रार्थनेशिवाय धर्म असूच शकत नाही, प्रार्थनेमुळे स्वर्गाची दारे उघडतात इ. प्रकारे प्रार्थनेचे माहात्म्य सांगितले जाते. प्रार्थनेमुळे मनोधैर्य वाढून सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

**- विनायक देशमुख,अहमदनगर.**

# ज्यांचे अंतःकरण शुद्ध आहे ते धन्य आहेत

कारण त्यांनाच सर्वकाही प्राप्त होते . अंतःकरण शुद्ध ठेवणे मात्र सहज सोपे नाही . त्यासाठी मात्र मनाचा मोठेपणा व समुजतपणाच असावा लागतो . एकदा मन स्वच्छ व मोकळे झाले की जीवन देखील खुप सुंदर व आनंदी वाटू लागते . मग आपण खऱ्या अर्थाने जीवनाचा आनंद घेण्यास पात्र होतो .

बऱ्याच वेळा आपण मनामध्ये खुप मोठे ओझे घेऊन जीवन जगत असतो . अशा वेळ न चैन असते न समाधान असते . अशा वेळी आपण एका अनामिक भितीयुक्त व दडपणात जीवन जगु लागतो .

आजचे जीवन अनिश्चित व ताण तणावाचे झाले आहे . आज आपण खुप धावपळीचे स्पर्धेचे जीवन जगत आहोत . अशा वेळी आपणच पुढे येऊन आपलीच मदत करावी लागेल . आपल्याला सर्वकाही मिळेल . पण त्यासाठी आपले अंतःकरण कमालीचे स्वच्छ व प्रामाणिक असले पाहिजे . लोक तुमच्या कितीही विरोधात असु द्या , तुम्ही जर स्वच्छ व नितीमान असाल तर नियती नेहमीच तुम्हाला मदत करण्यासाठी सज्ज असते . अशा वेळी तुम्ही जीवनाचा एक अलौकीक आनंद घेत असता . हीच एक परिपूर्ण जीवनाची सुरुवात असते .

**- प्रा. युवराज आप्पासाहेब हलकुडे .**

# श्री विठ्ठलाची शासकीय पूजा

१९७३ पासून पुन्हा श्री विठ्ठलाची शासकीय पूजा चालू झाली, ती आजतागायत चालू आहे. त्या संबंधीच्या या काही मनोरंजक आठवणी आणि किस्से.

श्री क्षेत्र पंढरपूर हे विजापूरच्या आदिलशाहीत होते. थोरले बाजीराव पेशवे पंढरपुरी दर्शनास येऊन गेल्याचे पुरावे आहेत. पुढे पंढरपूर पेशवाईत आले, तेव्हा पेशव्यांनी या मंदीराच्या देखभालीसाठी देवस्थान समिति नेमली. दुसरे बाजीराव तर महिनाभर पंढरपुरी वास्तव्यास असत. देवस्थान समितीचे सदस्य आषाढी वारीला पांडुरंगाची पूजा करत. १८३९ मध्ये ही पूजा करण्याचा मान सातारच्या गादीकडे होता. इंग्रजांच्या काळात हिंदू कलेक्टर, प्रांत, मामलेदार हे सेवा ज्येष्ठतेनुसार शासकीय पूजा करीत. इंग्रज सरकार पूजा अर्चे साठी या देवस्थानाला वर्षाकाठी दोन हजार रुपयांचे अनुदान देत असे. स्वातंत्र्योत्तर काळातही पहिली काही वर्षे हे शासकीय अधिकारीच श्री विठ्ठलाची पूजा करीत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राजाराम बापू पाटील हे महसूल मंत्री असताना पूजेसाठी पंढरपुरी आले होते. त्यांनी या देवस्थानचे वार्षिक अनुदान दोन हजार रुपयांवरून २० हजार रुपये केले. त्यानंतर महाराष्ट्रातील मंत्र्यांच्या हस्ते शासकीय पूजा करण्याची प्रथा चालू झाली. १९७० मध्ये समाजवादी लोकांनी ङ्गनिधर्मी राज्यात सरकारने पूजा अर्चा करणे योग्य नाहीफ म्हणून जनआंदोलन छेडले. त्याचा परीणाम म्हणून १९७१ साली शासकीय पूजा झाली नाही. १९७२ मध्ये महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला. शेतकरी हवालदिल झाले. लोक आपली शेतीवाडी, गुरेढोरे सोडून कामधंद्यासाठी शहरांकडे जाऊ लागले. वारकरी म्हणू लागले, सरकारने पूजा बंद केली म्हणून विठ्ठल कोपला आणि महाराष्ट्रात दुष्काळ पडला. वारकरी संप्रदायाच्या शिष्टमंडळाने तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना साकडे घातले. त्यांनीच ही बंद पडलेली शासकीय पूजा १९७३ पासून पुन्हा चालू केली. ती आजतागायत चालू आहे.

मुख्यमंत्री वसंतदादा पाटील आषाढी यात्रेच्या पूजेला पंढरपुरी आले होते. तेव्हा पांडुरंगासमोर दक्षिणेच्या रूपात त्यांना मागणे मागितले. ङ्गगरीब भाविक यात्रेकरूंना द्यावा लागणारा, यात्रा कर रद्द करा.फ त्याप्रमाणे दादांनी नुसता पंढरपूरचाच नाही तर देहू आळंदी येथीलही कर रद्द केला. ही पांडुरंगाच्या महापूजेची किमया! महाराष्ट्राचे एक माजी गृहमंत्री आषाढी एकादशीच्या महापूजेस पहाटे अडीच वाजता आले. खाली सोवळे वर खादीचा सदरा! रात्रीची बहुधा उतरली नव्हती, जीभ अडखळत होती. दक्षिणेसाठी खिशात हात घातला तर खिसा रिकामा! त्यांनी जिल्हाधिकाऱ्याला दम देऊन दक्षिणा देण्यास लावली. रुक्मिणी मातेच्या पूजेस आल्यावर पुन्हा दक्षिणेचा प्रश्न आला. आता जिल्हाधिकाऱ्याकडेही पैसे नव्हते. त्यांनी ङ्गउत्पातफ समितीच्या कार्यालयातून पैसे घेऊन देवीसमोर ठेवले.

शरद पवार मूळचे समाजवादी असल्याने नास्तिक होते. पंढरपूरच्या साखर कारखान्याच्या गळीत हंगामाला ते येत असत, पण देवळात येत नसत. पत्नीने फारच आग्रह केल्यावर केवळ तिच्या आग्रहासाठी ते एकदा विठ्ठल मंदीरात आले. पत्नी मनोभावे पूजा करत होती. बाहेरच्या हत्ती दरवाजातील कट्ट्य़ावर बसून शरदराव कार्यकर्त्यांशी गप्पा मारत होते. पत्रकारांनी खवचटपणे विचारले, तुम्ही देव मानीत नाहीत तर मग पांडुरंगाच्या पूजेला कसे काय आलात..? राजकारणात मुरलेल्या पवारांनी लगेच हजरजबाबी उत्तर दिले, माझ्या महाराष्ट्राची कोट्यावधी जनता पांडुरंगास देव मानते, त्यांच्या धार्मिक भावनेचा आदर करण्यासाठी आज मी इथे आलो आहे.

इंदिरा गांधी सत्तेतून पायउतार झाल्यावर साधारण १९७९/८० च्या दरम्यान पहाटे चार वाजता पंढरपूरला आल्या. अंबाबाईच्या पटांगणातील पहाटेची भव्य सभा उरकली आणि पहाटे स्नान करून विठ्ठल मंदीरात पूजेला बसल्या. दर्शन, पूजाअर्चा करून डाक बंगल्यावर आल्या. टेबलावरती नाश्त्याची जय्यत तयारी होती. त्यात नेहमीचे पदार्थ आणि उकडलेली अंडी होती. पांडुरंगराव डिंगरे हे पंढरपूरचे माजी आमदार व इंदिरा गांधीजींचे भक्त होते. त्यांनी विनंती केली, मॅडम, आज एकादशी आहे आणि हे पांडुरंगाचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. तेव्हा आजच्या दिवशी तरी हे अन्न तुम्ही घेऊ नका. त्या लगेच होय म्हणाल्या आणि फक्त दूध घेऊन तडक पुढच्या दौऱ्याला निघाल्या.

मनोहर जोशी मुख्यमंत्री म्हणून पूजेस आले. तेव्हा महाराष्ट्रात दुष्काळसदृश परीस्थिती होती. जुलै महिना अर्धा झाला तरी पाऊस पडला नव्हता. त्यांनी पांडुरंगासमोर हात जोडून विनवणी केली. बा पाडुरंगा, महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडू दे. देवस्थान समितीला विनंती केली, शासकीय महापूजेचा कालावधी कमी करा, वारकऱ्यांना रांगेत तिष्ठत उभे रहावे लागते याची जाणीव ठेवा. आषाढी एकादशीची पूजा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आणि कार्तिकी एकादशीची पूजा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ही प्रथा मनोहर जोशी यांच्या काळातच चालू झाली.

शालिनीताई पाटील एकदा पंढरपुरी पूजेला आल्या होत्या, तेव्हा, मनोभावे त्यांनी रुक्मिणी मातेला नवस केला. आमच्या भोळ्या दादांना पक्षातील लोकांनीच दगाफटका केला, पण दादा पुन्हा मुख्यमंत्री होऊ देत, मी तुला पाच तोळ्यांचे मंगळसूत्र वाहीन! चमत्कार म्हणा, श्रद्धा म्हणा, दादा खरंच परत मुख्यमंत्री झाले आणि शालिनीताईंनी तो नवस फेडला. पण त्यानंतर स्वतः मुख्यमंत्री होण्यासाठी साठी नवस करूनही त्या स्वतः मात्र कधीच मुख्यमंत्री झाल्या नाहीत.

१९५३ मध्ये पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू पंढरपूरला आले होते. दर्शनाला जाताना, विठ्ठलाच्या गाभाऱ्याच्या दगडी उंबरठ्यावर ते जोरात ठेचकाळले. एक अशुभ घटना म्हणून पुढील काळात तो दगडी उंबरठाच काढून टाकण्यात आला. रुक्मिणी मातेच्या मंदीरात मात्र तो दगडी उंबरठा अजूनही आहे.

राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद सर्वोदय संमेलनासाठी १९५५ च्या दरम्यान पंढरपूरला आले होते. गावात प्रवेश केल्यावर, डाक बंगल्यावर न जाता, सरळ स्नानासाठी ते चंद्रभागा नदीच्या तीरावर गेले. सुरक्षा रक्षकांची धावपळ झाली. ते चंद्रभागेच्या पात्रातून अनवाणी चालत वाळवंट, महाद्वार घाट, नामदेव पायरी ओलांडून विठ्ठल मंदीराच्या मंडपात आले. एका दमात चालत आल्यामुळे त्यांना किंचित धाप लागली, म्हणून एखाद्या वारकऱ्यासारखे तिथल्या दगडी कट्ट्यावर बसले. काहीक्षण विश्रांती घेऊन, तिथून पूजेकरता देवाच्या गाभाऱ्यात गेले. पूजा चालू असताना तेथील ब्राह्मणांच्या बरोबरीने ते स्वत: मंत्र म्हणू लागले. पूजा झाल्यावर ते इतके संतुष्ट झाले की तेथील बडव्यांना त्यांनी विनंती केली, की माझी पत्नी पंढरपूरला येईल तेव्हा तिच्या हातूनही अशीच पूजा करा. त्याप्रमाणे महिनाभरात त्यांच्या पत्नी पूजा करून गेल्या.

राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग हे संत नामदेव जन्म सप्तशताब्दी निमित्त पंढरपूरला आले. ते प्रथम चंद्रभागेच्या काठावरील नामदेव मंदीरात गेले. तेथील नामदास महाराज हे संत नामदेवांचे वंशज आहेत हे सांगितल्यावर ते नामदास महाराजांच्या पाया पडले. नंतर महाद्वारातून संत नामदेव पायरीशी आल्यावर त्यांनी देवळाच्या दरवाजात नामदेव पायरीला साष्टांग दंडवत घातला. पंजाबी आणि शीख बांधवांना संत नामदेव यांच्याविषयी किती आदर आहे, याचे त्याक्षणी प्रत्यंतर आले. त्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणीची महापूजा केली. तेव्हा विठ्ठलासमोर दक्षिणा म्हणून तात्यासाहेब डिंगरे यांनी त्यांच्याकडे एकच मागणे मागितले, बार्शी लाईट रेल्वे ब्रॉडगेज करा व अमृतसर ते पंढरपूर अशी मनानक नामदेव एक्सप्रेसफ चालू करा. त्यावर ते प्रसन्नपणे हसले.

राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा हे उपराष्ट्रपती व राष्ट्रपती असताना किमान तीनचार वेळा पंढरपुरी येऊन महापूजा करून गेले. त्यांच्यामुळे पंढरपूरची रेल्वे ब्रॉडगेज झाली.

यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री व संरक्षण मंत्री असताना पंढरपुरी येऊन महापूजा करून गेले होते.

१९८५ साली शिवसेनेचे महाडचे अधिवेशन झाल्यावर सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख राम भंकाळ शिवसेना प्रमुखांना पंढरपूर भेटीचे निमंत्रण देण्यास गेले होते. तेव्हा देशात घातपाताचे प्रकार चालू होते. शिवसेना प्रमुख उद्वेगाने म्हणाले, तुझ्या त्या पांडुरंगाला माझा निरोप दे, डोळे मिटून कमरेवर हात ठेवून काय उभा आहेस..? हाती जोडा घे आणि धर्मांध शक्तींना पार चिरडून टाक! नंतर ते ही पंढरपुरी येऊन पांडुरंगाचे दर्शन घेऊन आले.

चंद्रशेखर सरस्वती आणि कांची कामकोटी पीठाचे परम आचार्य आणि श्री सत्य साईबाबाही विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपुरी आले होते.

आचार्य विनोबा भावे सर्वधर्मीयांना घेऊन विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरपूरला आले होते. मंदीराच्या गाभाऱ्यात विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवून ते ओक्साबोक्शी रडू लागले. क्षणभर तिथे पसरली. लोकांनी विचारले, आचार्य, तुम्ही असे का रडता..? रडवेल्या आवाजातच ते म्हणाले, ज्या पायांवर संत ज्ञानेश्वर महाराजांनी, संत नामदेव, एकनाथ, तुकारामांनी डोके टेकविले, त्या पायांवर मी आज डोके टेकवित आहे. हे माझे किती जन्मांचे भाग्य आहे याची तुम्हाला कल्पना नाही! हे माझे आनंदाश्रू आहेत.

पूर्वी बाळासाहेब भारदे, शशिकांत पागे यासारखी वारकरी संप्रदायाची, आध्यात्मिक क्षेत्राची जाण असलेली मंडळी मंदीर समितीवर होती. आज काल राजकीय नेमणूका केल्या जातात. आषाढी कार्तिकीला पूजेला येणे भावनेपेक्षा प्रतिष्ठेचे लक्षण बनत चालले आहे. नैतिक मूल्ये जोपासणाऱ्या राजकीय नेत्यांची ही अतिशय बोलकी दोन उदाहरणे...

शंकरराव चव्हाण केंद्रात संरक्षणमंत्री असताना आषाढीवारीच्या पौर्णिमेनंतर विठ्ठलाच्या दर्शनास आले. त्यांना पूजा करायची होती. पण प्रशाळ पूजा झाल्याशिवाय मंदीरात महापूजा करता येत नाही ही येथील परंपरा आहे. हे त्यांना सांगितल्यावर माझ्यासाठी तुम्ही नियम मोडू नका, मी फक्त दर्शन घेऊन परत जातो असे म्हणाले व त्याप्रमाणे ते नुसते दर्शन घेऊन परत गेले.

लालबहादूर शास्त्री हे रेल्वेमंत्री असताना बार्शी लाईट रेल्वेने पंढरपुरी आले. त्यांना पांडुरंगाचे दर्शन घेण्याची इच्छा होती, पण वारी असल्याने रेल्वे स्टेशनवर कॉलऱ्याची लस टोचून घेतल्याशिवाय गावात प्रवेश करता येत नव्हता. नगर पालिकेच्या अधिकाऱ्यास ते म्हणाले, माझ्या आयुष्यात मी कोणतीही लस टोचून घेतलेली नाही. तेव्हा मी हे इंजेक्शन घेणार नाही. तेव्हा अधिकारी म्हणाले, तुम्ही केंद्रीय मंत्री! तुम्हाला इथे कोण अडविणार..? तेव्हा शास्त्री म्हणाले, मी इंजेक्शन घेणार नाही आणि मंत्री असलो तरी इथला नियम मोडणार नाही. ते पांडुरंगाचे दर्शन न घेता चक्क पंढरपूर रेल्वे स्टेशनवरून परत गेले.

आषाढीवारीच्या निमित्ताने, पांडुरंगाच्या साक्षीने आपण सर्वांनीच यातून नैतिकतेचा बोध घेण्याची गरज आहे असे मला प्रकर्षाने वाटते..!

***

**- अरुण पुराणिक**

यशवंत
धाराशिव जिल्हा
शनिवार दि. २० जुलै २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

# कांदा आयात तात्काळ थांबविण्याची दुधगावकर यांची मागणी

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – अफगाणिस्तान व इतर देशातून कांदा आयात करण्यात येत आहे. त्यामुळे ती आयात तात्काळ थांबविण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दि.१९ जुलै रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, मागील वर्षापासून निर्यातीवर वेगवेगळे निर्बंध लादले होत. कांदा निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क व ५५० डॉलर्स किमान मूल्य या अटी लागू करून निर्यात बंदी सरकारने हटवली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना कांद्याचे चार पैसेही मिळाले नाहीत. कांदा उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाला. केंद्र सरकारने ४० टक्के निर्यात शुल्क व ५५० डॉलर्स किमान निर्यात मूल्य हे तात्काळ हटवून कांद्याची संपूर्ण निर्यात बंदी उठवावी. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य दर मिळेल व शेतकरी कर्जबाजारी होणार नाही. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन संबधितांना आदेशित करावे, अशी मागणी दुधगावकर यांनी



केली आहे.

# विशाळगड येथील हल्लेखोरांवर कारवाईसाठी मुस्लिम समाजाचे आंदोलन

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड व गजापूर येथे कट रचून धार्मिक स्थळ मज्जिद व अल्पसंख्यांक मुस्लिम लोकांवर हल्ला करणाऱ्या गुंडावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीसाठी मुस्लिम समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. दरम्यान, संबंधित गुन्हेगारावर युएपीए कायद्या अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींसह प्रधानमंत्री, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, राज्यपाल, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दि.१९ जुलै रोजी केली आहे.

दिलेल्या नियोजनात असे नमूद करण्यात आले आहे की, दि.१४ जुलै रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड व गजापूर येथे काही जातीयवादी लोकांनी मुस्लिमांचे धार्मिक स्थळ असलेल्या दर्गाह, मज्जिद व निष्पाप मुस्लिम समाजातील लोकांवर विशेष करून महिलांवर भ्याड हल्ला केला आहे. यामध्ये मज्जिद व मुस्लिम लोकांच्या घराचे तसे दुकानाचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे. विशाळगड येथील हजरत मलिक रेहान दर्गाह हे सर्व धर्मीयांचे पवित्र स्थान असून या दर्गाहवर हिंदू व मुस्लिम भाविकांची निस्सीम भक्ती आहे. या गडावरील काही घरे व दुकानांचे अतिक्रमण याबाबतचा विषय उच्च न्यायालय प्रलंबित असून ती अतिक्रमणे काढण्यासाठी न्यायालयाने स्थगिती दिलेले आहे. मात्र काही दंगेखोरांनी विशाळगडाहून गजापूरमध्ये येणाऱ्या मुस्लिम लोकांवर भ्याड हल्ला केला आहे. या हल्ल्यात काही मुस्लिम गंभीर जखमी झाले असून साहित्याची लूट देखील केलेली आहे. विशेष म्हणजे यापूर्वी देखील या दर्गाहवर छोट्या तोफ सदृश्य यंत्राने फटाक्याचा बॉम्ब फोडून हल्ला करण्याचा प्रयत्न सांगलीचे माजी आमदार नितीन शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काही जातीयवादी तरुणांनी केला होता. त्याच शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आठ जुलै रोजी विशाळगडावर महाआरतीचे नियोजन करण्यात आले होते. त्यावेळी शिंदे यांनी दर्गाह व मुस्लिम समाज यांच्या विरोधात चितावणीखोर भाषण दिले होते. तसेच माजी खासदार छत्रपती संभाजी यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी. विशेष म्हणजे राज्यातील मुख्यमंत्री गृहमंत्री व सत्तेतील आमदार खासदार हे नेहमीच मुस्लिम समुदायाच्या विरोधात





भडकाऊ भाषण करीत आहेत. मुस्लिमांवर हल्ला करण्याच्या घटना झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य ओळखून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशामार्फत चौकशी करावी अशी मागणी केली आहे. संबंधित हल्ले कडक कारवाई करण्यात यावी, संबंधित निष्क्रिय व कर्तव्यात कसूर करणारे जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे. केलेल्या हल्ल्यांमध्ये धार्मिक स्थळे व मुस्लिम समाजाच्या घरांची झालेली नुकसान भरपाई शासनाने द्यावी. हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या व्यक्तींना प्रत्येकी ५ लाख रुपये सरकारने द्यावेत. मुस्लिम समाजाला संरक्षण देण्यासाठी त्वरित विशेष अधिवेशन बोलावून तत्काळ कायदे पारित करण्यात यावेत व या सर्व घटनेची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी आदी मागण्या केल्या आहेत. या निवेदनावर एआयएमआयएमचे जिल्हाध्यक्ष सिद्दीक इब्राहिम बौडीवाले उर्फ गोलाभाई, माजी जिल्हाध्यक्ष मुस्तफा खान, धाराशिव तालुकाध्यक्ष मोहसीन शेख आदींसह इतर समाज बांधवांच्या सह्या आहेत.

दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांनी या घटनेच्या निषेधार्थ घोषणाबाजी केली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाने तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# ५ हजारांची लाच स्विकारल्या प्रकरणी प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकासह हवालदार गजाआड

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – एका धाब्यासमोर ३ शेळ्या व २ बकरे बेवारस मिळाले होते. या प्रकरणी तक्रारदारावर चोरीचा गुन्हा दाखल करण्याऐवजी किरकोळ कारवाई केली. त्याचे बक्षीस म्हणून प्रशिक्षणार्थी (परिविक्षाधीन) पोलीस उपनिरीक्षक व पोलीस हवालदार यांनी तक्रारदाराकडे ५ हजार रुपयांची लाच मागून ती पंचा समक्ष स्विकारली. त्यामुळे लाच लुचपत विभागाच्या पथकाने त्यांना लाच स्विकारताना रंगेहात पकडून बेड्या ठोकले आहेत. विशेष म्हणजे प्रशिक्षणार्थी असलेले पोलीस उपनिरीक्षक हे एक प्रकारे हवाल्या मार्फत म्हणजेच आपल्या हाताखालील कर्मचारी असलेल्या हवालदार मार्फत लाच कशी स्विकारायची ? याचे एक प्रकारे प्रशिक्षणच घेत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यातील तक्रारदार यांचे मालकीचे उपळाई पाटी, सोलापुर धुळे महामार्ग, तालुका कळंब येथे दिनेश व्हेज, नॉनव्हेज या नावाचे रेस्टॉरंट असून त्या धाब्या समोर काही दिवसांपूर्वी ३ शेळया व २ बकरे बेवारस मिळून आले होते. त्या शेळया व बकरे तक्रारदाराच्या ताब्यात मिळाल्याबाबत तक्रारदार यांच्यावर चोरीचा गुन्हा नोंद न करता तक्रारदार यांच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११०/११७ अन्वये किरकोळ कारवाई केली. त्यामुळे तक्रारदारास मदत केली म्हणून यातील प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक रामचंद्र बहुरे व पोलीस हवालदार महादेव मुंडे यांनी तक्रारदाराकडे पंचासमक्ष बक्षीस म्हणून ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करुन पो.ह. मुंडे यांनी पंचासमक्ष ५ हजार रुपये लाच रक्कम स्विकारली. त्यावेळी लाच स्विकारणारे पोउनि बहुरे व पोह मुंडे यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा यशस्वी सापळा संदीप आटोळे छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक (मो.न. ९९२३०२३३६१), अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव (मो.नं. ९८८१४ ६०१०३) यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे उप अधीक्षक तथा सापळा अधिकारी सिध्दाराम म्हेत्रे (मो. क्र. ९५९४६५८६८६) यांनी पोलीस अंमलदार स.फौ. इफ्तेकार शेख, मधुकर जाधव, नागेश शेरकर यांच्या पथकाने केली. दरम्यान, लोकसेवक अथवा त्यांच्यावतीने कोणी खाजगी व्यक्ती कायदेशीर काम करून देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर कार्यालय क्रमांक ०२४७२ – २२२८७९ व टोल फ्री क्रमांक – १०६४ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने एक वृक्ष आईच्या नावे मोहिम

मुरूम दि.१९ (प्रतिनिधी) – येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने एक वृक्ष आईच्या नावे या मोहिमे अंतर्गत दि.१८ जुलै रोजी वृक्षारोपण करण्यात आले.

मुरुम येथे या मोहिमे अंतर्गत महाविद्यालयातील परिसर, गणेशनगर व नाईकनगर (दत्तक गाव) येथे विविध जातींच्या वृक्षांचे वृक्षारोपण उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक प्रा.डॉ. सतिश शेळके, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे, डॉ. शिला स्वामी, अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.डॉ. महेश मोटे, डॉ. किरण राजपूत, डॉ. शिवपुत्र कनाडे, डॉ. मुकूंद धुळेकर, डॉ. राजेंद्र गणापूरे,



डॉ. विनायक रासुरे, डॉ. विलास खडके, डॉ. रविंद्र गायकवाड, डॉ. राम बजगिरे, डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. आप्पासाहेब सुर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती. यासाठी डॉ. रविंद्र आंळगे, डॉ. रमेश आडे, डॉ. सोमनाथ बिरादार, प्रा. दयानंद बिराजदार, अजिंक्य राठोड, इसाली चाऊस, श्रावण कोकणे व दिलीप घाटे यांनी पुढाकार घेतला.

# राष्ट्रवादीचे अध्यक्ष पवार यांचा वाढदिवस जिल्ह्यात अजित पर्वाने साजरा होणार

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९ जुलै रोजी पार पडली. या बैठकीमध्ये पार्टीचे ना पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण जिल्हाभरात अजित पर्व साजरे करण्यात येणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, प्रदेश सरचिटणीस सुरेश पाटील, प्रदेश सचिव गोकुळ शिंदे आदी उपस्थित होते. या बैठकीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष पवार यांच्या वाढदिवसानिमित्त व्याख्यान माला, वृक्षारोपण, रक्तदान, विद्यार्थ्यांना वह्या वाटप, मोफत आरोग्य व नेत्र रोग तपासणी शिबिर, लाडकी बहीण योजनेचे मोफत फॉर्म भरणे, शासनाच्या विविध योजनांची माहिती, महिलांची आरोग्य तपासणी, महिलांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आदी विविध समाजोपयोगी कार्यक्रम पक्षाच्यावतीने राबविण्यात येणार आहेत. तर वाढदिवस संपूर्ण जिल्हाभरात अजित पर्व सप्ताह म्हणून साजरा करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस जिल्हा कार्याध्यक्ष समयोद्दीन मशायक, प्रवीण यादव, प्रदेश संघटक सचिव खलील पठाण, कळंब तालुकाध्यक्ष शिवाजीराव लकडे, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, परंडा तालुकाध्यक्ष अमोल काळे, धाराशिव शहराध्यक्ष



सचिन तावडे, कळंब शहरध्यक्ष दत्ता तनपुरे, महिला जिल्हाध्यक्षा सरला खोसे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष असद खान पठाण, किसान सेल जिल्हाध्यक्ष प्रकाश बावने, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सलीम हन्नुरे, उदय चंद्र खंडागळे, नानासाहेब पवार, महिला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण, प्रतीक माने संदिप गंगणे, शमसोद्दीन जमादार, रंजना भोजने, लता सातपुते, अमर मडके, विनोद जाधव, सोहेल बागवान, विशाल काळे, नासिर शेख, निहाल शेख, अकबर पठाण, उषा लागडे, वैभव मोरे, संदिप बनसोडे, सुलोचना जाधव, अरफात काझी, अमीना शेख, निलोफर सय्यद, प्रकाश बालकुंदे, कलीम शेख, सुरेश राठोड, सुहास मेटे, जुबेर शेख, सौरभ देशमुख, शाहू धावारे, कमलाकर बनसोडे, अंबादास वाघमारे, नवनाथ सातपुते, श्रीराम जगदाळे, रंजीत गायकवाड, शैलेंद्र शिंगाडे, प्रज्योत बनसोडे, सखाराम जाधव, अरफात पठाण, सय्यद नामोन, सुभाष कदम आदी उपस्थित होते.

# निकृष्ट दर्जाचे बियाणे पुरविणाऱ्या ग्रीन गोल्ड कंपनीला ग्राहक न्यायालयाचा दणका

## ३१ हजार रुपये ८ टक्के व्याजासह नुकसान भरपाई देण्याचे आदेश

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील एका शेतकऱ्याला ग्रीन गोल्ड कंपनीने निकृष्ट दर्जाचे बियाणे दिल्यामुळे त्याचे नुकसान झाले होते. या प्रकरणी त्या शेतकऱ्याने जिल्हा ग्राहक न्यायालयामध्ये धाव घेऊन न्यायाची अर्जीव केली होती. ॲड संदीप गणपतराव कठारे यांनी केलेला योग्य युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने बियाणे विक्री केलेल्या ग्रीन गोल्ड कंपनीला ३१ हजार ४१६ रुपये द.सा.द.शे. ८ टक्के व्याजासह देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच तक्रारदाराला आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रासापोटी ५ हजार रुपये व तक्रारदाराला खर्चापोटी ५ हजार रुपये हे निकाल लागल्यापासून ४५ दिवसांच्या आत देणे बंधनकारक आहे. हे प्रकरण २०२० मधील असून शेतकऱ्याला न्याय मिळाला आहे. मात्र भोळ्या शेतकऱ्याला निकृष्ट दर्जाचे बियाणे देऊन फसवणूक करणाऱ्या बियाणे कंपनीला दणका दिला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, धाराशिव येथील जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगाच्या न्यायालयात धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील तक्रारदार शेतकरी गंगाधर व्यंकट परीट यांनी ॲड संदीप गणपतराव कठारे यांच्यामार्फत ग्रीन गोल्ड बियाणे कंपनी छत्रपती संभाजीनगर राज्य महाराष्व यांच्याविरूदध कंपनीने निकृष्ट बियाणे देवुन फसवणुक केलीबाबत व नुकसान भरपाई मिळणेबाबत तकार दाखल केली होती. तकारदाराने जे. एस ३३५ बियाणे हे ढोकी येथील रणबीर कृषी मार्फत २ बॅग हे २०२० साली खरेदी केलेले होते. सदरचे बियाणे हे तकारदारानी त्यांच्या शेतात पेरणी केली होती व योग्य पदधतीने पेरणी करूनही बियाणे उगवुन आले नाही. हे पाहून तक्रारदारांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे तकार करून शेताचा पंचनामा करावा असा अर्ज दिला होता. त्या अनुषगांने पंचनामा व पाहणी करून अहवाल दिला. ते बियाणे निकृष्ट दर्जाचे आहे असा अहवाल दिलेला होता. त्यानंतर शेतकऱ्याने ॲड संदीप गणपतराव कठारे यांच्यामार्फत जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगाच्या न्यायालयात






सदोष बियाणे देवून फसवणूक केल्याबाबत व नुकसान भरपाई रुपये व्याजासाह मिळणेबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर तक्रारदार शेतकरी यांच्यावतीने धाराशिव येथील ॲड कठारे यांनी मे. कोर्टात हजर होवून या प्रकरणात दाखल केलेले कागदपत्रे व सादर केलेले पुराव्यानिशी विचार मे. कोर्टान करून ते बियाणे दोषयुक्त असून बियाणे कंपनीने निकृष्ट दर्जाचे बियाणे दिले असून सेवा देण्याबाबत त्रुटी केली आहे. त्यामुळे तक्रारदारास ३१ हजार ४१६ रुपये देण्याबाबत आदेश केला. तक्रार दाखल केल्यापासून द.सा.द.शे ८ टक्के व्याजासह संपूर्ण रक्कम तक्रारदाराच्या हातात पडेपर्यंत देय राहील असा आदेश केला. तसेच तक्रारदार शेतकरी यांच्यावतीने वतीने ॲड कठारे, यांनी केलेला अंतीम युक्तीवाद ग्राह्य धरून ती तक्रार जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगाने तकार मंजुर केली. त्यामुळे एखाद्या शेतकऱ्याची बियाणे कंपनीने फसवणूक केली तर त्यांनी रितसर न्यायालयाचा मार्ग निवडून न्याय मिळवून घेता येतो


# शेतमालाच्या हमीभावासाठी राज्यभरात शेतकरी जनजागरण यात्रा काढणार – निटुरे

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – शेतकऱ्यांनी पिकविलेल्या मालाला हमीभाव मिळत नाही. तर उत्पादनाचा खर्च निघत नसल्याने शेती व्यवसाय अडचणीत सापडला आहे. विशेष म्हणजे देशभरातील शेतकरी सरकारच्या धोरणामुळे भरडला जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा यासाठी राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीच्यावतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दि.२१ जुलैपासून जनजागरण यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अरुण निटुरे यांनी दिली.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमी भाव मिळत नाही. कर्जबाजारीपणा, नापिकी व हमी भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी संकटात सापडतो. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आत्महत्या शिवाय दुसरा पर्याय उरत नसल्याने आजपर्यंत लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रासह देशभरातील शेतकऱ्यांना न्याय मिळणे गरजेचे आहे. कारण भारत देश आज महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहे. काही अंशी त्या दृष्टीने काही पाऊले पडत आहेत. परंतू सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेत मालाला हमीभाव मिळाल्याशिवाय प्रगतीला वाव मिळणार नाही. त्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. कारण देशाला जागतिक महासत्ता बनवायचे असून देशाला स्वयंपूर्ण बनवून निर्यात वाढ झाली पाहिजे. त्यासाठी जागतिक बाजारपेठ काबीज करून शेती उत्पादनाला चालना दिली पाहिजे. नाहीतर जागतिक महासत्ता स्थान भारतासाठी गृहजळ ठरेल. ही बाब लक्षात आणून देण्यासाठी शेतकरी जनजागरण यात्रा काढत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच शेतीमधून पिकणाऱ्या प्रत्येक वस्तू व मालाला हमी भाव मिळाला तर शेती विकासाला मोठी संधी मिळू शकते. कारण भारतीय शेती बहुतांशी निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. त्यामुळे सरकारकडून हमीभाव हा शेती विकासाला मोठा आधारभूत ठरू शकतो. हमी भाव मिळाला तर शेतकरी बिनधास्त आणि विदेश चलन मिळवून देणारा शेतमाल उत्पादित करू शकतो.

याकरिता सर्वांच्या दैनंदिन जीवनामध्ये चव आणणारा भाजीपाला बाजारात वाढला की भाव मिळत नाही. त्यामुळे कवडीमोल भावाने विकावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे. लागते. भाजीपाला नाशिवंत असल्याने व मागणी पुरवठा संतुलन हाणेकमरिता भाजीपाला टिकवून ठेवण्यासाठी कोल्ड स्टोअरेज संख्या वाढविणे गरजेचे आहे. अर्थात हमी भाव मिळण्यास मदत होणार आहे. तसेच कापूस देखील विशिष्ट काळामध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असते. त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित भाव मिळत नाही. म्हणून त्याला देखील हमी भाव देण्याकरिता प्रक्रिया उद्योग उभारणे, खरेदी विक्री केंद्र सुरू करणे आणि निर्यातील प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. याबाबत शेतीमधून उत्पादित होणारी धान्ये व कडधान्ये यांना देखील हमी भाव मिळणे आवश्यक आहे. ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ, मका, कांदा व नाचणी या प्रमुख धान्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. हंगामी शेती असल्यामुळे शेतकऱ्यांकडे गोडवून सुविधा नसते. तसेच आर्थिक क्षमते अभावी लगेच विक्रीसाठी बाजारात आणले जाते. त्यामुळे मागणी पुरवठा असंतुलन होते. परिणामी अपेक्षित भाव मिळत नाही. तसेच कडधान्य सोयाबीन, तूर, मूग, मटकी आदी पिकांना हमी भावाची गरज आहे. कारण ही कडधान्य देखील लवकर खराब होतात. त्यासाठी उत्पादनानंतर लगेच विक्रीस येतात. त्याच दरम्यान भाव पडतो. अर्थात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. यामध्ये सोयाबीन पिकांची मोठी लागवड होते. अनिश्चित निसर्गाच्या कचाट्यातून सुटून चांगले सोयाबीन आले की कधीकधी भाव मिळत नाही. त्यामुळे हमीभाव अत्यंत गरजेचा आहे. या सर्व बाबी लोकशाही मार्गाने केंद्र व राज्य सरकारच्या लक्षात आणून देण्यासाठी आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांना हमी भावाचा न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय किसान बहुजन पार्टी मैदानात उतरत आहे. त्यासाठी आम्ही दिल्लीला धडक देणार असून महाराष्ट्रात शेतकरी जनजागरण यात्रा, प्रत्येक जिल्ह्यात बैठका व पत्रकार परिषदा आयोजित करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी माल पिकवायचा आणि दर दुसऱ्यांनी ठरवायचा, ही व्यवस्था बदलली पाहिजे. यासाठी सरकारला जाग आणणे गरजेचे असल्यामुळे जनजागरण यात्रा काढण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीच्या वतीने दिल्ली येथे शेतमालाला हमीभाव मिळणेसाठी शेतकरी जनजागरण यात्रा काढण्यात येणार आहे. याची सरकारने दखल घेऊन हमीभाव देण्यासाठी योग्य पावले उचलावीत. कारण भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीवरच आधारलेली आहे. त्यामुळे शेतीचा विकास म्हणजे देशाचा विकास हे सूत्र



सरकारच्या लक्षात आणून देवून देशाच्या विकासासाठी सरकारला हमीभाव देण्यास भाग पाडण्यासाठी राष्ट्रीस किसान बहुजन पार्टीच्यावतीने महाराष्ट्रभर शेतकरी जनजागरण यात्रा काढण्यात येणार असल्याचे निटुरे यांनी सांगितले.

## संपादकीय

### प्रकाशयात्रा!

आपल्या सग्यासोयऱ्यांवर कसा वार करू' म्हणून शस्त्रं टाकलेला अर्जुनाला खऱ्या स्व'रूपाची जाणीव करून देणारे, त्यासाठी त्यांनी केलेला उपदेश म्हणजे भगवद्गीता' होय. अर्जुनाच्या मिषाने साऱ्या जगाचे संसाराचे आ-ेझे हलके करणारे श्रीकृष्ण! त्यासाठी त्यांनी सगळ्यांना दिला गीते'चा प्रकाश! या गीतेच्या प्रकाशात असंख्य भक्त उजळून निघाले, उजळून निघत आहेत आणि पुढेही उजळून निघतील, कारण गीता आणि ज्ञानेश्वरी आहे प्रकाशयात्रा!'

**ज्ञानेश्वरी – प्रा. मनीषा रत्नाकर रावराणे**

रणांगणात आपल्या आप्तांना पाहून, भांबावून गेलेला अर्जुन! आपल्या सग्यासोयऱ्यांवर कसा वार करू' म्हणून शस्त्रं टाकलेला अर्जुन! या अर्जुनाला भानावर आणणारे भगवान श्रीकृष्ण! त्याला खऱ्या स्व'रूपाची जाणीव करून देणारे. त्यासाठी त्यांनी केलेला उपदेश म्हणजे भगवद्गीता' होय. मुळात अर्जुनासाठी सांगितली गेलेली गीता ही खरं तर साऱ्या मानवजातीला उपयोगी आहे. संसारात गोंधळून गेलेल्या सामान्यजनांना ती योग्य मार्ग दाखवते, जगण्याला दिशा देते. या गोष्टीचं वर्णन ज्ञानदेव कसं करतात, ते ऐकण्यासारखं आहे. त्यासाठी पाहूया अठराव्या अध्यायातील अद्भुत ओव्या!

म्हणून वेदाचेही सुसेवन करण्यास योग्य अशी ही मूर्तिमंत गीता स्वतः श्रीकृष्णांनी पंडुसुत अर्जुन याला सांगितली.' ओवी क्र. १४६६

परंतु वासराचे प्रीतीकरिता सर्व घरादाराला गाईच्या दुधाचे सुख मिळते, त्याप्रमाणे अर्जुनाच्या निमित्ताने सर्व जगाचा उद्धार झाला.' ओवी क्र. १४६७

चातकाची कळकळ मनात बाळगून मेघ पाण्याची वृष्टी करितो, त्या वृष्टीने सहज सर्व जगाचे जसे सांत्वन होते.' ओवी क्र. १४६८अथवा एकनिष्ठ जे कमल, त्याला प्रफुल्लित करण्याकरिता वारंवार सूर्य उदयास येतो, परंतु तेवढ्याने त्रिभुवनातील सर्व प्राण्यांच्या डोळ्यांना प्रकाश मिळाल्यामुळे सुख होते.' ओवी क्र. १४६९

या न्यायाने श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या मिषाने गीता प्रकाशून, जगाचे संसाराएवढे मोठे ओझे हलके केले.' ओवी क्र. १४७०

ही ओवी अशी –

तैसें अर्जुनाचेनि व्याजें। गीता प्रकाशूनि श्रीराजें।
संसारायेवढें थोर ओझें । फेडिलें जगाचें।। ओवी क्र. १४७०

किती अचूकपणे, यथार्थपणे ज्ञानदेवांनी हा विचार मांडला आहे! त्यासाठी अप्रतिम दृष्टांत दिले आहेत. यातील पहिला दाखला गाय आणि वासरू यांचा आहे. श्रीकृष्ण हे वत्सल गाईप्रमाणे, तर अर्जुन हे त्याचं वासरू आहे. गीता ही दुधाप्रमाणे आहे. वासरासाठी असलेल्या दुधाचा लाभ सगळ्या घराला मिळतो, त्याप्रमाणे गीतेने साऱ्या मानवजातीचं पोषण होतं. हे पोषण चांगल्या विचारांचं, वागणुकीचं होतं. यानंतरचा दृष्टांत चातक पक्ष्याचा आहे. चातकाची तहान भागवणारा मेघ आहे. त्याप्रमाणे ज्ञानासाठी, भगवंताच्या भक्तीसाठी तृषाकूळ अर्जुन आहे. मेघामुळे संपूर्ण चराचर निवतं. त्याप्रमाणे गीतारूप वृष्टीने सगळ्या मानवप्राण्यांना लागलेली आत्मज्ञानाची तहान भागते, ते तृप्त होतात. पुढील दाखला कमल व सूर्याचा आहे. कमलाला उमलवण्यासाठी सूर्य रोज उदयाला येतो. त्यामुळे साऱ्या त्रिभुवनाला प्रकाशाचे सुख मिळते. सूर्याप्रमाणे तेजस्वी, जीवनदाता श्रीकृष्ण आहेत, तर अर्जुन हा कमलाप्रमाणे आहे. श्रीकृष्णांचा प्रकाश म्हणजे गीता' होय. यातील तत्त्वविचाराने अर्जुनाच्या जोडीने सर्व त्रिभुवनातील लोकांचे अंतःकरण उजळून निघते. गाय-वासरू-घरदार, मेघ-चातक-जग, सूर्य-कमल-त्रिभुवन असे हे एकाहून एक सुंदर, अर्थपूर्ण दाखले ज्ञानदेव देतात. त्यातून त्यांना जो सांगायचा विचार आहे, तो सुस्पष्ट होतो. तो विचार आपण ऐकला. अर्जुनाच्या मिषाने साऱ्या जगाचे संसाराचे ओझे हलके करणारे श्रीकृष्ण! त्यासाठी त्यांनी सगळ्यांना दिला गीते'चा प्रकाश! या गीतेच्या प्रकाशात असंख्य भक्त उजळून निघाले, उजळून निघत आहेत आणि पुढेही उजळून निघतील, कारण गीता आणि ज्ञानेश्वरी आहे प्रकाशयात्रा!'

# साहित्यिक, स्वातंत्र्यसैनिक - सरोजिनी नायडू



भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात चार वेळा तुरुंगवास भोगलेल्या साहित्यिक, स्वातंत्र्यसैनिक सरोजिनी नायडू यांनी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला स्फूर्तिदायी संदेश जनतेला दिला. या संदेशात त्या म्हणतात, या प्राचीन राजधानीवर स्वातंत्र्याची मंगल सुप्रभात भरजरी वेषात येत आहे. लाल किल्ल्यावर उद्या स्वतंत्र भारताचा ध्वज फडकणार. कित्येक वर्षे परदास्यात असताना आम्ही जी स्वप्ने रंगवली, ती प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही सर्वस्व अर्पण करु.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतातील उत्तरप्रदेश या सर्वात मोठ्या राज्याच्या पहिल्या राज्यपाल म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. ३ मार्च १९४९ रोजी या अलौकिक व्यक्तीमत्वाचे निधन झाले. भारत सरकारने सरोजिनी नायडू यांच्या मृत्यूनंतर जादा गॅझेट काढले. त्यात 'एक उत्कृष्ट वक्त्या, थोर कवयित्री, अलौकिक व विन-ोदाची असाधारण देणगी असलेली स्त्री' असा सरोजिनी नायडू यांचा उल्लेख आहे. १९३० मध्ये पदार्थविज्ञान शाखेचे नोबेल पारितोषिक विजेते सर चंद्रशेखर रामन हे सरोजिनी नायडूंच्या मृत्यूनंतर त्यांना श्रद्धांजली वाहताना म्हणाले, सरोजिनी ही माझ्या आयुष्यात मला आढळून आलेली सर्वात बुद्धीमान स्त्री होती.

सरोजिनी नायडू यांचे जन्मस्थान हैदराबाद. त्यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी झाला. बंगाली घराण्यातील शास्त्रज्ञ, तत्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ अघोरनाथ चटोपाध्याय यांची ही थोरली मुलगी. आई बंगाली कवयित्री वरदासुंदरी चटोपाध्याय. त्यांचाच साहित्यिक वारसा सरोजिनी नायडू यांनी पुढे नेला. त्यांची आकलनशक्ती वाखाणण्यासारखी होती. त्यामुळे त्यांचे वडील अघोरनाथ चटोपाध्याय यांनी त्यांना हायस्कूलमध्ये पाठविण्याचे ठरविले. त्याकाळी मुलींना हायस्कूलमध्ये पाठविण्यास समाजाची मान्यता नव्हती. त्याकाळी हैदराबादमध्ये चांगले हायस्कूल नव्हते. यासाठी त्यांना वडिलांनी शिक्षणासाठी मद्रासला पाठविण्याचे ठरविले. १८९१ मध्ये त्यांचे वय १२ वर्षे असताना त्यांनी मद्रास विद्यापीठाची परीक्षा देऊन पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्या. अशी परीक्षा देणारी पहिलीच विद्यार्थिनी म्हणून सरोजिनी चटोपाध्याय यांची नोंद झाली. उर्दू, तेलगू, इंग्रजी, पर्शियन आणि बंगाली भाषेचा अभ्यास केलेल्या सरोजिनी यांना वडिलांकडून सहिष्णूतचे व सर्वधर्मसमभावाचे तसेच या सर्व भाषांवर प्रभुत्व मिळविण्याचे धडे मिळाले.

विलायतेत शिक्षण

याच काळात सरोजिनी चटोपाध्याय यांनी इतिहास, तत्वज्ञान व हिंदू धर्माचाही अभ्यास हाती घेतला. विशेष म्हणजे याच काळात कवयित्री सरोजिनी चटोपाध्याय म्हणून त्या प्रसिद्ध पावल्या. सरोजिनी चटोपाध्याय यांची उपजत हुशारी लक्षात घेता, आपल्या मुलीने विलायतेत शिक्षण घेऊन विदुषी व्हावे, असे तिच्या वडिलांना वाटले. त्यांनी जर्मनीत तसेच स्वीडनमध्ये रसायनशास्त्राची डी.एस.सी ही पदवी घेऊन १८७७ मध्ये ते भार-तात आले होते. निझाम सरकारमध्ये अघोरनाथ चटर्जी अधिकारी म्हणून कार्यरत होते.

नंतरच्या काळात सरोजिनी चटोपाध्याय यांचा सर एडमंड गॉस व आर्थर सिमॉन्स या दोन कवींशी परिचय झाला आणि एडमंड गॉस यांच्या सल्ल्यानंतर त्यांच्या कवितांमध्ये स्थित्यंतर झाले. आंग्ल पार्श्वभूमीऐवजी त्यांच्या कवितांना भारतीय पार्श्वभूमी प्राप्त झाली.

किंग्ज कॉलेजमध्ये दोन वर्षे काढल्यानंतर सरोजिनी यांनी केंब्रीज विद्यापीठाच्या गर्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. या कॉलेजमध्ये असतानाच सरोजिनी यांच्या काव्याला धुमारे फुटू लागले. एडमंड गॉस यांचा कृतज्ञापूर्वक उल्लेख करणाऱ्या सरोजिनी यांनी त्यांच्या एका काव्यसंग्रहाला 'गोल्डन थ्रेशोल्ड' असे समर्पक नाव दिले. अखेर १८९८ मध्ये सरोजिनी भारतात परतल्या; पण त्यांचे प्रेम डॉ.गोविंद नायडू यांच्यावरच कायम राहिल्याने याच वर्षी त्यांचा विवाह वडिलांनी त्यांच्याबरोबर करून दिला आणि सरोजिनी चटोपाध्याय सरोजिनी नायडू झाल्या.

कवयित्री व वक्त्या म्हणून सरोजिनी नायडू यांचे नाव भारतभर गाजू लागले होते; पण १९०४ पासून सामाजिक कार्यकर्त्या म्हणूनही त्या जगासमोर आल्या.

१९०४ मध्ये संस्थानात आलेल्या महापुरामुळे प्रचंड नुकसान झाले. त्या काळात सरोजिनी नायडू यांनी समाजातील पीडित गोरगरिबांसाठी निधी, कपडालत्ता, औषधे मिळवून नियोजनपूर्वक प्रचंड काम केले. भारतातील प्लेगच्या साथीच्या काळात केलेल्या कार्याबद्दल ब्रिटीश सरकारने सरोजिनी नायडू यांना कैसर-ए-हिंद पदक प्रदान करून गौरविले.

याच काळात भारतात महिलांच्या हक्काच्या चळवळीला सुरुवात झाली होती. साहजिकच सरोजिनी नायडू यांच्यासारख्या प्रतिभावान स्त्रियांना या चळवळीत अग्रभागी राहून सहधर्मचारिणींना, भगिनींना व कन्यांना शिक्षण द्या, त्यांना ज्ञानाचा प्रकाश दाखवा असा व्याख्यानांचा दौरा भारतभर करावा लागला. त्यांच्या व समविचारी इतर नेत्यांच्या कार्यामुळे अनेक स्त्रिया राष्ट्रकार्यात येऊ लागल्या.

काँग्रेसच्या कार्यकर्त्या–

१९०५ मध्ये बंगालच्या फाळणीने भारतभर जी वैचारिक घुसळण झाली. त्यामध्ये सरोजिनी नायडू या अग्रभागी राहून स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवर आल्या. लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गो-खले, रविंद्रनाथ टागोर, बॅ.जीना, ॲनी बेझंट, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू यांच्याशी १९०३ ते १९१७ पर्यंत त्या आपल्या कार्याने संपर्कात होत्या. त्या अभ्यासपूर्वक काँग्रेसच्या कार्यात भाग घेऊ लागल्या. डॉ. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी त्यावेळी होमरूल (स्वायत्तता) चळवळ सुरू केली होती. सरोजिनी नायडू यांनी होमरूल चळवळीच्या पुरस्कारासाठी देशात ठिकठिकाणी सभा घेतल्या. १३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बागेत झालेल्या हत्याकांडाच्या निषेधार्थ ब्रिटीश सरकारला कैसर-ए-हिंद मिळालेला सन्मान सरोजिनी नायडू यांनी परत केला. लोकमान्य टिळक यांच्या निधनानंतर सरोजिनी नायडू पूर्णतः गांधीवादी झाल्या. पे-हराव व राहणीमान यात त्यांनी आमूलाग्र बदल केले. रौलट कायदा, मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, साबरमती करार वगैरे विविध चळवळीत हिरीरीने त्यांनी भाग घेतला. त्यांनी आपले वास्तव्य मुंबईत हलविले.

त्या मुंबई महानगरपालिकेत सभासद म्हणून निवडून आल्या. पुढे प्रांतिक काँग्रेसच्या १९२१ मध्ये अध्यक्ष झाल्या.

ॲनी बेझंट यांच्यानंतर पहिल्या भारतीय महिला म्हणून १९२५ मध्ये कानपूर येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्ष म्हणून त्या निवडल्या गेल्या. हिंदू-मुसलमान यांचे ऐक्य या धोरणासाठी त्या कायम कार्यरत होत्या. त्यांचा दुसरा काव्यसंग्रह १९१२ मध्ये 'द बर्ड ऑफ टाइम' प्रकाशित झाला. या काव्यसंग्रहाला एडमंड गॉस यांची प्रस्तावना आहे.

मिठाचा सत्याग्रह–

१२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधींची प्रसिद्ध दांडीयात्रा सुरु झाली. ५ एप्रिल १९३० रोजी दांडी येथे पोहोचल्यावर गांधीजींनी समुद्र किनाऱ्यावर कायद्याचा भंग करून चिमूटभर मीठ उचलले. त्यावेळी सरोजिनी नायडू यांनी उत्स्फूर्त आरोळी दिली.... करळश्र ंिहश डरु ईशिरज्ञशी. त्यानंतर गांधीजी यांना अटक झाली व नेतृत्व अब्बास तय्यबजी यांच्याकडे आले; परंतु त्यांनाही अटक झाल्यावर सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांच्याकडे आले. तो दिवस १६ मे १९३० होता. आपल्या तुकडीतील २००० सत्याग्रहींसह सरोजिनी नायडू धारासनाच्या मिठागरावर मोर्चा घेऊन गेल्या. एका अमेरिकन वार्ताहराने या मोहिमेचे वृत्तांकन असे केले आहे... रस्ता धुळीने माखला होता. राष्ट्रवादाने भारून गेलेले लोक एका स्त्रिच्याभोवती जमले होते. तिच्यासमोर लाठीधारी व बंदुकधारी पोलीस होते. तिने एक इंचही पुढे सरकू नये असा त्यांचा निर्धार होता. उन्हाळ्याचे दिवस असल्याने ऊन रख-रखत होते. त्यांना त्रास होऊ नये म्हणून सरोजिनी नायडू यांना दिलेली छत्री त्यांनी नाकारली. उलट त्यांनी पोलिसांना सांगितले की, मला कोणाच्या दयेची गरज नाही. मी आणि माझे सत्याग्रही मिठागराभोवतीच्या तारा तोडून कायदा मोडणारच! कायदा मोडत असताना सरोजिनी नायडू यांना अटक करण्यात आली व त्यांना पहिली नऊ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा झाली. सरकारशी झालेल्या काँग्रेसच्या समेटीनंतर त्यांना सात महिन्यानंतर तुरुंगातून सोडण्यात आले. सुटका झाल्यानंतर सरोजिनी नायडू भारतीय स्त्रियांच्या प्रतिनिधी म्हणून गोलमेज परिषदेला गेल्या. तेथून त्या दक्षिण आफ्रिकेतही गेल्या. पुन्हा ४ जानेवारी १९३२ रोजी सरकारी दडपशाहीमुळे महात्मा गांधी यांच्याबरोबर सरोजिनी नायडू, पंडित मदनमोहन मालवीय यांना अटक होऊन एक वर्षाची दुसऱ्यांदा कारावासाची शिक्षा त्यांना झाली. यावेळी सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी व मीराबाई यांना येरवडा येथे एकाच ठिकाणी ठेवण्यात आले होते. १९३९ मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सनदशीर हक्कासाठी केली. यामध्ये सरोजिनी नायडू यांना भाग घेतल्याने तिसरा पुन्हा कारावास घडला.

शेवटचा कारागृह ऑगस्ट १९४२ 'छोडो भारत' या आंदोलनात घडला. महात्मा गांधी यांच्यासोबत त्या २१ महिने तुरुंगात होत्या. १९४३ मध्ये तर सरोजिनी नायडू तुरुंगात अतिशय आजारी होत्या. सरकारने आपल्यावर ठपका यावयास नको म्हणून त्यांची तुरुंगातून सुटका केली. दुसऱ्या महायुद्धानंतर १९४६ मध्ये काँग्रेस पक्षाने मध्यवर्ती सरकारमध्ये सामील होण्याचे ठरवले, हे सरकार हंगामी होते. त्या भारताच्या राज्यघटना परिषदेच्या सभासद होत्या.

भारताची घटना भारताने निवडलेल्या घटना परिषदेने करावी अशी काँग्रेसची मागणी होती. १९१९ मध्ये सरोजिनी नायडू यांनी बॅ. मोहंमद जीना यांचे आत्मचरित्र प्रकाशित केले होते. 'भारताची नाइटिंगेल' ही पदवी मिळालेल्या सरोजिनी नायडू यांच्या निधनानंतर १९६१ मध्ये त्यांची मुलगी पद्मजा नायडू यांनी संपादित केलेले त्यांच्यावरील 'द फेदर ऑफ द डॉन' प्रकाशित केले. त्यांचे 'द इंडियन वीव्हर्स' १९७१ मध्ये प्रकाशित झाले. त्यांच्या कवितेमध्ये सुंदर शब्द होते जे तसेच गायले जातात.

--------------

**–गाऊ त्यांना आरती : शिरीष चिटणीस**
प्रतिनिधी महाराष्ट्र साहित्य परिषद

## उपदेशकथा: वडिलांना मदत

भगवान बुद्ध त्या काळात आपल्या शिष्यगणांसह गावोगावी जात होते. एका गावाच्या वेशीवर एक वृद्ध आपल्या म ोठ्या टोपलीतून भाजी विकण्यास बसला होता.ती टोपली जड होती व त्याला तेथून दुसरीकडे जायचे होते म्हणून येणाऱ्या – जाणाऱ्या वाटसरुंना तो आपल्या डोक्यावर टोपली ठेवण्यास मदत करण्याची याचना करत होता. पण कोणीही त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. ते शिष्यगणही मजा बघत होते.



हे पाहताच भगवान बुद्ध स्वत: पुढे झाले व त्यांनी वृद्धाच्या डोक्यावर टोपली उचलून दिली. त्या वृद्धाने त्यांना आ-ेळखले होते.

तो म्हणाला, साऱ्या जगाच्या दृष्टीने ते कोणीही असोत, पण माझ्या दृष्टीने म ाझ्या मुलासारखे आहेत ! त्याचे बोलणे ऐकून शिष्य आश्चर्यचकित झाले. त्यांनी विचारले, हे कसे शक्य आहे? तो वृद्ध उत्तरला, जगात प्रत्येक म ुलगा हा आपल्या मातापित्यांचा आधार असतो. त्यांचे कष्ट उपसण्यास नेहमीच मदत करत असतो.आज त्यांनीही मला मदत केली आहे.

माझे कष्ट हलके केले आहेत. मग ते माझ्या मुलासम ानच नाहीत का? साऱ्या शिष्यांनी त्या वृद्धाचे पाय धरले व क्षमा मागितली.

## मशरूमचे हे फायदे वाचून तुम्ही लगेचच खाण्यास कराल सुरूवात

काही जणांना मशरूम खायला आवडत नाही. तुमचेही उत्तर जर हा असे आहे तर याचे एकदा फायदे जाणून घ्या थंडीच्या दिवसांत अनेक आजार आपल्या अवतीभवती असतात. अशातच आपले डाएट योग्य ठेवणे गरजेचे असते. या बदलत्या वातावरणाशी लढण्यासाठी आपण निरोगी असणे गरजेचे असते. अशातच मशरूम ही अशी गोष्ट आहे जी तुमच्या शरीराला अनेक फायदे मिळवून देते. मशरूम आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. हे तुम्ही सॅलड, सँडविच, पिझ्झा, मिक्स व्हेज, मंच्युरियन म्हणून खाऊ शकता.व्हिटामिन डी मोठ्या प्रमाणात

व्यस्त वेळापत्रकामुळे अनेकांना उन्हात बसायला वेळ मिळत नाही.



त्यामुळे व्हिटामिन डीची कमतरता होते. अशातच तुम्ही व्हिटामिन डीची कमतरता भरून काढण्यासाठी मशरूमचे सेवन करू शकता.

पोषकतत्वांनी भरपूर

मशरूममध्ये व्हिटामिन डी, बी, सेलेनियम, पोटॅशियम आणि कॉपर मोठ्या प्रमाणात असते. हे व्हिटामिन्स शरीराल विविध आजारांशी लढण्यास मदत करतात. सोबतच आरोग्य चांगले राखतात.

इम्युनिटी वाढते.मशरूममध्ये बायोॲक्टिव्ह कंपाऊंड मोठ्या प्रमाणात असतात जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करतात. यात बीटा ग्लुकेन नावाचे तत्व असते जे थंडीत येणाऱ्या सर्दी तापासासाठी तसेच इन्फेक्शनविरोधात लढण्यास मदत करते.

अँटीऑक्सिडंटचा खजाना

मशरूम्समध्ये मोठ्या प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स असतात जे सेल्युलार हेल्थ मजबूत करतात आणि स्ट्रेस रिलीज करतात.

वेट लॉसमध्ये फायदेशीर

वजन घटवण्यासाठी जे लोक दिव-सरात्र मेहनत करत आहेत त्यांनी आपल्या डाएटमध्ये मशरूम्सचा समावेश करावा. यातील फायबर्स फॅट कमी करण्यास मदत करतात.

## राशी भविष्य



२० जुलै २०२४ (पीएसआय)–

मेष : शुभ रंग:पिवळा: शुभ दिशा:पश्चिम
प्रतिष्ठीत व्यक्तींच्या संपर्कामुळे फायदा होईल. आपल्या आर्थिक परिस्थिती सुधारेल. कामे टाळण्याचा प्रयत्न करू नका. व्यापारातील नवीन योजना फायदेशीर राहतील.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व
नम्रपणा सोडू नका. वयस्कर लोकांचा सन्मान व आदर ठेवा. व्यापारीक निर्णय वेळेत घेतल्याने फायदा होईल. कौटुंबिक समस्या दूर होतील.

मिथुन : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम
अति उत्साह आपल्याला नुकसान पोहचवेल. प्रवासाचा फायदा होणार नाही. अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती सोडा. व्यापार मध्यम राहील.

कर्क : शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा:पूर्व
व्यक्तिगत कामात प्रगती राहील. आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. समाजात आपले कौतुक होईल. व्यापार फायदेशीर राहील. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

सिंह : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:उत्तर
व्यापार चांगला चालेल. संपत्ती बाबत आकांक्षा पूर्ण होतील. कामामध्ये यश मिळविण्यासाठी प्रयत्नशील रहा. कौटुंबिक किंवा घराची समस्या भेडसावेल.

कन्या : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
वेळेत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. मित्रांचे व सगे सोयऱ्यांचे सहकार्य मिळेल. निष्कारण वाद विवाद, तणाव टाळला पाहिजे. व्यापाराती योग्य निर्णय फायदेशीर राहील.

तुळ: शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पूर्व
कौटुंबिक संबंध मधूर राहतील. मान सन्मान वाढेल. भागीदारीचे अनेक नवीन प्रस्ताव मिळतील. अनोळखी व्यक्तीपासून सावध रहा. अडकलेला पैसा मिळेल.

वृश्चिक: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
जीवनसाथीचे सहकार्य आपल्याला मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रतिष्ठीत लोकांच्या भेटीमुळे आपल्या फायद्यात वाढ होईल. प्रवासात सावधानी बाळगा.

धनु: शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
जोखमीचे व जबाबदारीचे कामे सावधतेने करा. निष्कारण धावपळ करू नका. प्रयत्न करून आज यश कमी मिळेल. कौटुंबिक सम स्यांची चिंता राहील.

मकर : शुभ रंग:भूरकट, शुभ दिशा:उत्तर
जीवनसाथीच्या प्रकृतीची चिंता जाणवेल. खर्च वाढल्याने आर्थिक टंचाई भासणार आहे. व्यापारा व्यवसाय सामान्य राहील. वादविवादापासून दूर रहा.

कुंभ: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
आपली दयाळू प्रवृत्ती, उदारतेमुळे आपल्याला एक नवीन सुख देऊन जाईल. नवीन पद मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणूकीच्या बाबतीत जागृत रहा. मुलांचे जीवन समाधानी राहील.

मीन : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
जास्त धावपळ केल्याने थकवा जाण-वेल. आपल्या अपक्षेप्रमाणे कामे होणार नाहीत. व्यवसायात फायदा मिळण्याची शक्यता कमी. आत्मविश्वास बाळगा.

२० जुलैला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर पूर्णतया चंद्राचाच प्रभाव आहे. मनाने तुम्ही अत्यंत हळवे आहात. इतरांबल तुम्हाला मनापासून प्रेम, आपुलकी, माया वाटते. उत्तम पालक बनण्यासाठी हे उत्तम गुण आहेत. इतरांची दु:खे तुम्हाला बऱ्याच वेळा त्यांनी न सांगताच कळतात. ती दूर करण्यात तुम्ही बऱ्याचवेळा तुमची वैयक्तिक कामे बाजूला ठेवता. संगीत, नाटक, चित्रपट वगैरे कलांचा आस्वाद घेणे तुम्हाला आवडते व त्यात नैपुण्यही मिळवू शकता. कार्यालयात तुमचे इतरांशी संबंध स्नेहाचे, सौहार्दाचेच असतात.

बाह्य परिस्थितीचा आपल्यावर भावनिक परिणाम करून घेण्यापेक्षा तिला अनुकूल वळण देण्याचा प्रयत्न करा. नैराश्याचा पगडा निसर्गाच्या सहवासात गेल्यास दूर होऊ शकेल. नैराश्य व उद-ासीनतेची परिणती मनोविकार, निद्रानाश, अल्सर यात होऊ शकेल. मनोबलासाठी ध्यान आवश्यक.

कार्यक्षेत्र : औषधयोजना वनस्पतीशास्त्र या विषयात रस असल्याने आयुर्वेद, निसर्गोपचार, वनस्पतीयुक्त सौंदर्यप्रसाधने या क्षेत्रात आपली क्षमता सिध्द करू शकाल. मिनरल वॉटर, शीतपेये, झटपट खाद्यपदार्थ, पंचतारांकित हॉटेल्सना खाद्यपुरवठा करणाऱ्या सेवा यात उत्कर्ष करून घेता येईल. मनोविकारांची चिकित्सा करणारे उपचारतज्ज्ञ, व्यवसाय मार्गदर्शक, समुपदेशक म्हणूनही भूमिका बजावाल.

प्रणयी जीवन : तुमची भावनिक आंदोलने सतत होत असल्याने जोडीदाराला तुमचा मूड सांभाळणे कठीण जाते. काही गोष्टींचा तुम्ही उगाच बाऊ करता असेही त्याचे म्हणणे असते. धसमुसळी माणसे तुम्हाला आवडत नाहीत. तुमच्या भावना सखोलपणे समजून घेणारा जोडीदार तुम्हाला फेब्रुवारी १९ ते मार्च २० मधील व्यक्तीत सापडेल.

वर्षफळ : कलाक्षेत्रात संबंध महत्वाची भूमिका बजावतील. भांडवलाचा प्रश्न सुटेल. नव्या निर्मितीचा शुभारंभ कराल. जुलै ऑगस्ट मध्ये गुंतवणुकीतून भरघोस लाभ पदरी पडतील. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये तांत्रिक नैपुण्य प्राप्त करणे लाभदायक ठरेल. डिसेंबर जानेवारी मध्ये अविवाहितांच्या मंगलकार्यात पुढाकार घ्याल. मार्च एप्रिल मध्ये लोकसंपर्काचे धोरण लवचिक हवे. मे जून मध्ये नव्या निर्मितीला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळेल.

महत्वाचे वर्ष : २, ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५.

भाग्यरत्न : मोती

याच तारेखेची व्यक्ती : राजेंद्रकुमार, नसीरुद्दीन शाह, देबाशिष मोहंती

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




## जेव्हा प्रेमातला सहजपणा संपतो... सूचक पोस्टवर अभिषेक बच्चनची प्रतिक्रिया

मुंबई -बऱ्याच काळापासून बॉलिवूड अभिनेता अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय बच्चन यांच्यात दुरावा आल्याचे म्हटले जाते. अशा अफवाह सुरु झाल्या आहेत की ते दोघे घटस्फोट घेत आहेत. खरंतर त्या दोघांनी या बातम्यांवर काहीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, आता अभिषेक आणि ऐश्वर्याच्या घटस्फोटाच्या अफवाह तेव्हा सुरु झाल्या जेव्हा अनंत आणि राधिकाच्या लग्नात ते वेग-वेगळे आले. त्यांनी एकत्र कोणतेही फोटो क्लिक केले नाही. मात्र, लग्नातील एक व्हिडीओ समोर आला होता. ज्यात अभिषेक हा त्याची पत्नी ऐश्वर्या आणि लेक आराध्यासोबत दिसला. या सगळ्यात अभिषेक बच्चनची एक पोस्ट खूप चर्चेत आली आहे.

अभिषेक बच्चनने ऐश्वर्यासोबत घटस्फोट घेतल्याच्या चर्चांमध्ये सोशल मीडियावर एक पोस्ट लाइक केली आहे. या पोस्टने सगळ्यांचे लक्ष वेधले आहे. अभिषेकने लाइक केलेल्या या पोस्टमध्ये घटस्फोट घेतानाचा कठीण काळ आणि ग्रे घटस्फोटच्या ट्रेंडवर चर्चा करण्यात आली होती. ही पोस्ट लेखिका हीना खंडेलवालने शेअर केली होती. ज्यात असे लिहिले होते की 'जेव्हा प्रेम हे सोपे राहत नाही. ज्या जोडप्यांचे लग्न झाले आहे ते आता विभक्त झाले आहेत. कोणत्या गोष्टी त्यांना हा निर्णय घेण्यासाठी भाग पाडतात आणि ग्रे घटस्फोट का वाढतोय?' त्या पोस्टमध्ये पुढे लिहिले आहे की ''घटस्फोट हा कोणासाठीच सोपा नसतो. कायम आनंदी राहण्याचं स्वप्न कोण पाहत नाही? कोण आहे जो सोशल मीडियावर वृद्ध लोकांचा हात धरून रस्ता ओलांडतानाच्या व्हिडीओला रिक्रिट करण्याचा विचार करत नाही? पण कधी-कधी आयुष्य हे तसं नसतं जसा आपण विचार करतो. पण जेव्हा लोके तुमच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग ठरतात आणि छोट्या छोट्या गोष्टींसाठी एकमेकांवर अवलंबून राहिल्यानंतर विभक्त होतात, तर ते या सगळ्याचा सामना कसं करत असतील? त्यांना रिलेशनशिपम धून बाहेर पडण्यासाठी कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरतात आणि त्यांना कोणत्या गोष्टींचा सामना करावा लागतो? ही पटकथा त्याच गोष्टींना दर्शवते. त्यामुळे ग्रे घटस्फोट आणि सिल्वर स्प्लिटर्स जगभरात वाढत आहेत. ग्रे डिव्हॉर्सचा अर्थ साधारपणे ५० वर्षांचे झाल्यानंतर जेव्हा जोडपं विभक्त होण्याचा निर्णय घेते त्याला म्हणतात. खरंतर कारण वेगवेगळी असतात, पण आश्चर्याची गोष्ट नाही.''

दरम्यान, अभिषेक बच्चनने देखील ही पोस्ट लाइक केली आहे. खरंतर अभिषेक बच्चनने ही पोस्ट लाइक केल्याने सोशल मीडियावर वेगळीच चर्चा सुरु झाली आहे. त्याचा एक स्क्रीनशॉट देखील सोशल मीडियावर व्हायरल होते आहे. इतकेच नाही तर स्वत: हीना खंडेलवाल यांनी देखील त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटच्या स्टोरीवरून याचा एक स्क्रिन शॉट शेअर केला आहे. त्यावरून अनेकांनी हा अंदाज बांधला आहे की अभिषेक आणि ऐश्वर्याचे नाते खराब झाल्यामुळे त्याने ही पोस्ट लाईक केली आहे.

# अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्या नात्यात दुरावा? ज्यु. बच्चनने घटस्फोटाच्या पोस्टला केले लाईक





मुंबई -बॉलिवूडच्या स्टार कपलपैकी एक अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्यात काही ठिक नसल्याचे दिसत आहे. नुकतेच अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या लग्नात हे जोडपे वेगळे दिसले होते. तेव्ह-ापासून अमिताभ बच्चन यांचे कुटुंब चर्चेत आले होते. अभिषेक बच्चननं घटस्फोटाच्या पोस्टला लाईक करून लोकांना बोलण्यास आता भाग पाडलं आहे. सोशल मीडियावर सक्रिय असणाऱ्या अभिषेकनं अनंत आणि राधिकाच्या लग्नसोहळ्यानंतर असे काही केलं आहे, ज्यामुळे आता सोशल मीडियावर त्याच्या नात्याबद्दल एक नवीन अंदाज बांधला जात आहे. आता सोशल मीडियावर यांच्या घटस्फोटाबद्दल चर्चा होत असून अनेकजण ऐश्वर्याला पाठिंबा देताना दिसत आहेत.

अभिषेक बच्चननं लाईक केली घटस्फोटाशी संबंधित पोस्ट : अभिषेकनं लाईक केलेली ही पोस्ट आता खूप चर्चेत आहे. ही पोस्ट लेखिका हीना खंडेलवाल यांनी शेअर केली होती. यावर अभिषेकने लाईक बटण दाबले आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले आहे की, ''जेव्हा प्रेम करणे सोपे होते. ज्या जोडप्यांनी लग्न केले आहे आणि आता वेगळे होत आहेत. त्यांना हे निर्णय घेण्यास कशामुळे प्रवृत्त केले आणि ग्रे घटस्फोट का वाढत आहेत?'' यानंतर त्यांनी पुढे लिहिले, ''घटस्फोट घेणे सोपे नाही, आता कोणाला सुखाने जगण्याचे स्वप्न पहायचे नाही, वृद्धापकाळात जोडीदाराचा हात धरून रस्ता ओलांडण्याची कल्पना कोण करत नाही? आयुष्य आपल्या अपेक्षेच्या विरुद्ध निघाले, पण सर्व काही ठीक दिसत असतानाही जर नाते तुटायला लागले तर आपल्याला कोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागते? हे अशा अनेक प्रश्नांवर प्रकाश टाकते, 'ग्रे घटस्फोट' आणि 'सिल्व्हर स्प्लिटर' (५० वर्षांनंतर घटस्फोट घेणारे लोक) संख्या वाढत आहे.''

अभिषेकच्या ऐश्वर्या नात्यात दुरावा : अभिषेक या पोस्टवर लाईक केल्यानंतर सोशल मीडियावर खळबळ उडवून दिली आहे. अभिषेकच्या घटस्फोटाच्या पोस्टला लाईक केल्यानंतर सर्वत्र युजर्स अभिषेक आणि ऐशच्या विभक्त होण्याची अंदाज बांधत आहेत. आता अनेकदा ऐश्वर्या आपल्या पतीबरोबर कमी आणि मुलगी आराध्या बरोबर जास्त ठिकणी दिसते. अनेकदा माय-लेकी एकत्र कुठेही जा-ताना दिसतात. ऐश्वर्याची बॉंडिंग आपल्या मुलीबरोबर खूप चांगली आहे.

# आनंदाकडून शांतीकडे जीवन संगीत - सद्गुरू वामनराव पै

सूर्य उगवतो, मावळतो असे आपण म्हण-तो, पण प्रत्यक्षात तो उगवतही नाही आणि मावळतही नाही. तो आहे तसाच, आहे तिथेच आहे. तसेच जीवाच्या ठिकाणी आहे. जीव शरीर धारण करतो व शरीर सोडतो. फक्त शरीर बदलते. जसा माणूस कपडे बदलतो त्याचप्रमाणे जीव शरीर बदलतो. जीवाला मरणही नाही आणि जन्मही नाही. जीवाच्या अपेक्षेत जन्म व मरण हे शब्द चुकीचे आहेत, त्यामुळे जन्म मरणातून सुटका म्हणणे देखील चुकीचे ठरेल. ते तत्त्व स्फुरद्रूप आहे म्हणून ते सतत स्फुरत असते. त्याला दाबणे शक्य नाही. तुम्ही म्हणाल सागराच्या लाटा दाबेन तर ते तसे शक्य होणार नाही. तसेच आपल्या ठिकाणी ती लाट उसळतच असते व ती उसळतच राहणार. आपण जे काही करतो ते सर्व आनंदासाठी करत असतो, आनंदातूनच निर्माण होत असते व आनंदासाठीच चाललेले असते. फक्त आपल्याला त्याची जाणीव नसते.

आपण लग्न करतो, कुटुंब वाढते. कशासाठी? आनंदासाठी. शाळा-कॉलेजमध्ये जाऊन शिक्षण घ्यायचे ते कशासाठी? ज्ञानासाठी, कारण आनंद हा ज्ञानातूनच येतो. म्हणून शाळा-कॉलेजात जाऊन ज्ञानाभिमुख अभ्यास केला पाहिजे, केवळ मार्क्स मिळविण्यासाठी नाही तर आनंदासाठी, ज्ञानासाठी केला पाहिजे. हे आम्ही नेहमी सांगत असतो. याचप्रमाणे गाणे शिकणे, सद्गुरूंकडून आध्यात्म शिकणे, वाद्य



वाजवायला शिकणे, या सर्व गोष्टी माणूस कशासाठी करत असतो. आनंदासाठी करतो की दुःखासाठी करतो? या सर्व गोष्टी आपण जीवनात आनंदासाठी करत असतो. खरं म्हणजे आपले स्वरूप हे आनंद असल्यामुळे तो आनंद आपल्याला बाहेरून आणावा लागत नाही. तो आतूनच स्फुरत असतो. स्वानंद बाहेर येतो तेव्हा तो आनंद होतो. हा आनंद दुसऱ्याला देतो तेव्हा ते सुख होते. हे सुख आपल्याकडे परत येते, तेव्हा ते समाधान होते. हे समाधान जेव्हा मुरते तेव्हा होते ती शांती. म्हणूनच शांती परते नाही सुख येर अवघेचि दुःख असे म्हटलेले आहे.

हे सर्व मी सांगतो आहे कारण मोक्ष या संकल्पनेबद्दल समाजात अनेक अंधश्रद्धा, चुकीच्या कल्पना व गैरसमज रूढ आहेत. आधी सांगितल्याप्रमाणे जन्म मरणांतून सुटका म्हणजे मोक्ष किंवा मोक्ष हे एक ठिकाण असून पुण्यवान माणसे मेल्यानंतर तिथे जातात, अशा विपरीत कल्पना जनमानसात मोक्षाबद्दल आहेत. प्रत्यक्षात मोक्षाचा अर्थ साधा व सरळ आहे. मोकळा होणे किंवा स्वतंत्र होणे म्हणजेच मोक्ष. मग प्रश्न निर्माण होतात की माणूस कोणत्या बंधनातून मोकळा होतो? आणि पारतंत्र्यात असणे म्हणजे नेमके काय? याचे उत्तर अगदी सोपे आहे. माणूस जन्माला येतो तेव्हा त्याला कसलीच बंधने नसतात. मात्र जसजसा तो वाढू लागतो तसतशी त्याला अनेक बंधने येऊन चिकटतात. मिळालेल्या नावापासून या बंधनांची सुरुवात होते. त्यानंतर गोत्र, कुल, जात, वर्ण, धर्म, पंथ, संप्रदाय ही सर्व बंधने त्याच्यावर लादली जातात. त्याच जोडीला मुलगा, भाऊ, काका, मामा, बाप अशा बंधनांनी तो जखडला जातो. या सर्व प्रकारातून आणि मिळालेल्या संस्कारांतून एक प्रकारचा मानसिक पिंजरा तयार होतो व तो माणूस त्यात अडकतो. हा मानसिक पिंजरा म्हणजेच माणसाला जडलेले बंधन किंवा पारतंत्र्य होय आणि जीवनविद्येच्या सिद्धांतानुसार या पिंजऱ्यातून माणसाची सुटका होणे म्हणजेच मोक्ष होय.


# उत्तर प्रदेशात भाजप अशांत

उत्तर प्रद-ेशात लवकरच दहा जागांसाठी पोट निवडणूक होत आहे. त्या आधी पक्षातील असंतोष उघड होऊ लागल्याने आदित्यनाथ यांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

उत्तर प्रदेशात विधानसभा निवडणुकीस बराच अवधी आहे. तरीही या राज्यातील घडामोडींनी भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वास अस्वस्थ केले आहे. पक्षाच्या राज्य शाखेचे अध्यक्ष भूपेंद्र सिंग चौधरी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्या आधी चौधरी आणि उप मुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी पक्षाध्यक्ष जे.पी.नड्डा यांची स्वतंत्रपणे भेट घेतली. या भेटीत काय चर्चा झाली याचे अधिकृत तपशील बाहेर आले नसले, तरी मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्याबद्दल तक्रारी मांडण्यात आल्या असे कळले आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात भाजपची कामगिरी खराब झाली. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाने राज्यातील ८० पैकी ६२ जागा जिंकल्या होत्या. या वेळी ही संख्या ३३ वर आली. काँग्रेस व समाजवादी पक्षाच्या युतीने ४३ जागा जिंकून भाजपला जबर हादरा दिला. हे निकाल जाहीर झाल्यापासून पक्षाच्या राज्य शाखेत असंतोष माजल्याची वृत्ते येऊ लागली होती. पक्षाने तातडीने एक समिती नेमून या पराभवाची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. आदित्यनाथ यांनी या निकालावर अति आत्मविश्वास नडला' असे मत व्यक्त केले होते. बहुधा त्यांचा रोख कार्यकर्ते व अन्य नेत्यांवर असावा. त्यामुळे पक्षातील नाराजी आणखी वाढली.


पक्ष' मोठा?

उत्तर प्रदेशात पुन्हा मोठ्या संख्येने जागा जिंकण्यासाठी भाजपने कोणतीही कसर ठेवली नव्हती. राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांच्यावर व्यक्तिगत स्वरूपाची टीका करण्यात आली. अयोध्येतील राम मंदिरास विरोधक बाबरी मशिदीचे टाळे लावतील, गायी काढून घेतील अशी भीती दाखवण्यात आली. हिंदु-मुस्लिम यांच्यात तेढ वाढवण्याचे प्रयत्न झाले तरी यशाने हुलकावणी दिली. राज्यात पक्षाला आलेल्या अपयशाची मीमांसा करणारा एक विस्तृत अहवाल राज्य शाखेने तयार केला. त्यासाठी सुमारे ४० हजार जणांची मते आजमवण्यात आली. अयोध्या आणि अमेठीमधील पराभव भाजपच्या जिव्ह-ारी लागलेला दिसतो.



राज्याच्या सर्व भागांत पक्षाच्या मतांचा हिस्सा आठ टक्क्यांनी घटल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यासाठी जी कारणे देण्यात आली आहेत त्यात; प्रशासनाच्या हडेलहप्पीपणाला जास्त महत्त्व देण्यात आले आहे. महत्त्वाच्या परीक्षांचे तीन वर्षांत पंधरा वेळा पेपर फुटणे, सरकारी नोकरीत कंत्राटी पद्धतीने भरती करणे यांचाही उल्लेख आहे. यामुळे राज्य सरकार राखीव जागांच्या विरोधात असल्याच्या विरोधकांच्या आरोपांना बळ मिळाल्याचे निरीक्षण या अंतर्गत अहवालात नोंदवण्यात आले आहे. या बरोबरच, पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष असल्याचेही त्यात म्हटले आहे. आदित्यनाथ यांनी अति आत्मविश्वास' हे कारण दिले असले तरी मौर्य यांना ते मान्य नाही. पक्ष हा सरकारपेक्षा मोठा आहे हे आपले मत त्यांनी वारंवार व्यक्त केले आहे. कार्यकर्त्यांचे दुःख आपले दुःख आहे असेही ते म्हणत आहेत. आदित्यनाथ पक्षातील छोटे-मोठे नेते, कार्यकर्ते यांना किंमत देत नाहीत हे मूळ गाऱ्हाणे आहे. भाजपची मातृसंस्था असलेल्या रा.स्व. संघाच्या स्वयंसेवकांकडे आदित्यनाथ दुर्लक्ष करत असल्याचाही आरोप छुप्या पद्धतीने व्यक्त होत आहे. आमदारांकडे काही अधिकार नाहीत, जिल्हाधिकारी आणि अन्य अधिकाऱ्यांचे राज्य सुरू आहे, असे एका वरिष्ठ नेत्याने म्हटल्याचे वृत्त एका दूरचित्रवाहिनीने दिले आहे. आदित्यनाथ यांचे बेधडक निर्णय, त्यांचे बुलडोझर धोरण आदी देशाच्या अन्य भागांत प्रसिद्ध असले तरी ते आपले नेते व कार्यकर्ते यांना विश्वासात घेत नसल्याची तक्रार होत आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांपेक्षा अधिकाऱ्यांवर ते जास्त विसंबून असतात असे बोलले जात आहे. यामुळे गरीब व मागास वर्ग पक्षाला दुरावत असल्याचे मत राज्याचे मंत्री संजय निषाद यांनीही व्यक्त केले आहे. चौधरी व मौर्य यांनी या तक्रारी नड्डा यांच्यापर्यंत पोचवल्याचे पक्षातून समजले आहे. पक्षाची हीच स्थिती राहिली, तर २०२७ची निवडणूक जड जाईल हे एका नेत्याचे मत वरिष्ठ नेत्यांना चिंतेत टाकणारे आहे.

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.साम ना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.म

# शिक्षक समन्वय संघाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

## जिल्हाधिकारी, उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांना निवेदन



लातूर (प्रतिनिधी) - राज्यातील अंशतः तथा विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील ६३ हजार शिक्षकांना १ जानेवारी २०२४ पासून अनुदानाचा वाढीव टप्पा प्रचलित धोरणानुसार मिळावा या मागणीसाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यालय समोर शिक्षक समन्वय संघ दिनांक २२ जुलैपासून धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन देण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की लातूर जिल्ह्यातील विना तथा अंशतः अनुदानित शिक्षकांनी दि. १९ जुलै रोजी लातूर जिल्हाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक , माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन देऊन २२ जुलैपासून जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्याचे निवेदन शिक्षक समन्वय संघाचे समन्वयक बाबासाहेब वाघमारे,सी डी कदम, संतोष उपाशे,विरेश स्वामी,अमोल मलवाडे, जावेद शेख, नितीन सेलुकर,माधव जाधव, वैजनाथ जाधव, गंगाधर डिगोळे, गिरीधर तेलंगे, महेश पाटील, गणेश परळी, बलभीम जगताप, विठ्ठल गोमारे, इसाबेग मंगरुळे यांच्या सह शेकडो शिक्षकांच्या वतीने देण्यात आले.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांना १ जानेवारी २०२४ पासून विना अट प्रतिवर्षी वाढीव टप्पा लागू करणे. माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी ९ नोव्हेंबर २०२३ रोजी आझाद मैदानावर येऊन दिलेला शब्द पाळणे, १२ जुलै २०२४ रोजी शिक्षणमंत्री यांची टप्पा वाढ अनुदानावर सभागृहामध्ये केलेली घोषणा याबरोबरच

राज्यातील पुणे स्तरावरील घोषित शाळांना अनुदानास पात्र करून अनुदान मंजूर करणे. त्रुटी पूर्तता केलेल्या राज्यातील शाळांना समान टप्प्यावर आणून टप्पा वाढ करणे. आचारसंहिते पूर्वी वाढीव टप्प्याचे किमान एक महिन्याचे वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा करून त्याचा शासन आदेश निर्गमित करणे. या सर्व मागण्या जोपर्यंत मान्य होणार नाहीत तोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक धरणे आंदोलन चालू राहील. शासनाने निर्णय नाही घेतला तर राज्यभरातील ही सर्व आंदोलने व राज्यभरातील ६२ हजार शिक्षक १ ऑगस्ट २०२४ पासून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन करणार आहेत. ती वेळ शासनाने येऊ देऊ नये, तत्पूर्वीच वेतन अनुदानाचा वाढीव टप्प्याचा व प्रतिवर्षी नैसर्गिक टप्पा वाढ सह वेतन वितरणाचा शासन आदेश निर्गमित करून शिक्षकांना न्याय द्यावा अशा प्रकारचे निवेदन लातूर जिल्ह्याच्या शिक्षक समन्वय संघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे देण्यात आले. यावेळी लातूर जिल्ह्यातील असंख्य शिक्षक उपस्थित होते.

# बालरंगभूमी परिषद लातूर शाखा कार्यकारिणी जाहीर

लातूर / प्रतिनिधी- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था असलेल्या बाल रंगभूमी परिषदेची शाखा लातूरमध्ये स्थापन झाली. दि. १४ जुलै रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत शाखेची कार्यकारिणी सर्वानुमते ठरवण्यात आली. ८५ आजीव सदस्य असलेल्या लातूर शाखेच्या सर्वसाधारण सभेत समन्वयक ड. शैलेश गोजमगुंडे यांनी निवड प्रक्रिया पार पाडली. याप्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी बाळकृष्ण धायगुडे, नाट्यस्पंदनचे अध्यक्ष डॉ. अशोक आरदवाड, अ. भा. म. नाट्यपरिषद लातूर महानगर शाखेचे उपाध्यक्ष डॉ. मुकुंद भिसे, महानगर शाखेचे कार्याध्यक्ष प्रा. दिपक वेदपाठक ज्येष्ठ रंगकर्मी प्रदीप भोकरे, महानर शाखेचे कार्यकारिणी सदस्य रुपेश सुर्यवंशी आदी निमंत्रित मान्यवर म्हणून उपस्थित होते. कार्यकारिणी पुढीलप्रमाणे



- अध्यक्ष - सुमती बिडवे - सोमवंशी, कार्याध्यक्ष मयूर राजापूरे, उपाध्यक्ष (उपक्रम) सुवर्णा बुरांडे, उपाध्यक्ष (प्रशासन) हिरा वेदपाठक, प्रमुख कार्यवाह प्रा. नवलाजी जाधव, सहकार्यवाह रणजित आचार्य व ड. बालाजी म्हेत्रे, कोषाध्यक्ष रवी आघाव, तर कार्यकारिणी सदस्य वनिता गोजमगुंडे, रवी सावंत, महेश पवार, तन्मय रोडगे, सलीम पठाण, महेश बिडवे, प्रिती ठाकूर, आकाश कुलकर्णी, ऋतुराज सुरवसे.

यावेळी सर्व नवनिर्वाचित कार्यकारिणी पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचे सत्कार करण्यात आले. तर सर्व निमंत्रित मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी लगेचच बालरंगभूमी परिषदेच्या वतीने होणाऱ्या लोककला महोत्सवाच्या नियोजनावर सांगोपांग चर्चा झाली. सभेचे सूत्र संचालन रणजित आचार्य यांनी केले तर आभार रवी आघाव यांनी मानले.

# विदयुत पोल/झाडे/दुभाजक यावरील अनाधिकृत जाहिरातीवर मनपा कार्यवाही करणार

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात फलक / बॅनर्स / होर्डींग्जण लावणेसाठी महानगरपालिकेची परवानगी आवश्यक आहे. तथापी शहरामध्ये सदयस्थितीत लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर, स्टिकर, त्रिकोणी चौकोनी आकारातील छोटे प्लेयक्सि/ बोर्ड, जाहिरात फलक/ पत्रके, गुंडाळफळी, कापडी फलक इत्यादी अनाधिकृत व अयोग्य ठिकाणी लावल्यामुळे शहराचे विद्रपीकरण होत आहे. तसेच सदरील अनधिकृत जाहिरात फलक/पोस्टर्स इत्यादी हे सुरक्षितपने नसल्याकारणाने दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअनुषंगाने लातूर शहरातील अनधिकृत बॅनर/ जाहिरात फलक/पोस्टार्स/ होर्डींग्जवर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही चालू आहे. तरी लातूर शहरातील लाईटचे पोलवर / रस्ता दुभाजकामध्ये / चौकामध्ये / झाडांना टांगत्या पध्दतीने लावण्यात आलेले तात्पुरत्या स्वूरुपामध्ये अनधिकृत बॅनर, स्टिकर, त्रिकोणी चौकोनी आकारातील छोटे प्ले क्सय/ बोर्ड, जाहिरात फलक/ पत्रके, गुंडाळफळी,




कापडी फलक इत्यारदी हे विनापरवाना अनधिकृतपणे लावण्यात आलेले आहेत. सदर लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर, स्टिकर, त्रिकोणी चौकोनी आकारातील छोटे प्लेपक्सि/ बोर्ड, जाहिरात फलक/ पत्रके, गुंडाळफळी, कापडी फलक इत्यादी हे तात्काळ काढून घेवून मनपास सहकार्य करावे. अन्यथा सदर अनधिकृत जाहिरात फलक / पोस्टर्स इत्यादी लावणा-यांवर गुन्हा नोंद करण्यात येईल. तसेच याव्दारे लातूर शहरातील जाहिरात / प्रिंटींग एजन्सी यांना कळविण्यात येते की आपणही महानगरपालिकेची परवानगीची खात्री केल्याशिवाय जाहिरात फलक / पोस्टार्स इत्याटदी हे प्रिंट करण्यायत येवू नये अन्यथा आपणाविरुध्दयोग्य ती कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

## पान १ वरून

### खेडकरांच्या...

खेडकर कुटुंबियांच्या मालकीची थर्मोव्हेरिटा ही कंपनी रेडझोन मध्ये आहे. तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेचा २०२२ पासून कर थकविला आहे. या कर थकविणा-या कंपनीवर जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त, प्रदीप जांभळे यांनी दिली.

### मालती महारुद्रप्पा...

देऊन सन्मानित केले जाणार आहे. यंदाचा पहिला पुरस्कार कर्नाटकातील कविता गुरुसिद्धय्या हिरेमठ यांना जाहीर झाला आहे. कविता यांनी आध्यात्मिक क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केली आहे. आजपर्यंत शेकडो महिलांना श्रीसिद्धान्त शिखामणी ग्रंथ पारायण आणि श्रीरुद्र पठणाचे प्रशिक्षण दिले आहे.

कर्नाटकातील धारवाड, बंकापूर, हुबळी, गोकाक, बागलकोट, बल्लारी, बदामी, हावेरी, ब्याडगी, हंसभावी, लक्ष्मेश्र्वर, बेळगाव, बिसनळ्ळी तसेच गोवा यांसह अनेक गावात त्या प्रशिक्षण देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल परमपूज्य श्रीकाशी महास्वामीजींनी घेतली. त्यांना आशीर्वाद, प्रोत्साहन आणि पुढील कार्यास बळ मिळावे म्हणून पहिल्या पुरस्कारासाठी कविता हिरेमठ यांची निवड केली आहे.

हा पुरस्कार सोहळा सोमवार दि. २२ जुलै रोजी श्री वीरशैव माहेश्र्वर वैदिक मंडळ, सोलापूर संचलित श्री वीरशैव लिंगायत जंगम कन्नड संस्कार केंद्र, श्रीराम नगर, जानकी नगरजवळ, जुळे सोलापूर येथे संध्याकाळी सहा वाजता संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी सोलापूरकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन सिद्धय्या स्वामी- हिरेमठ, डॉ. शिवयोगी शास्त्री- होळीमठ, रेवणसिद्ध वाडकर, बाबुराव मैंदर्गीकर यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस राजेंद्र बलसुरे, गुरुशांत रामपुरे, सिद्ध हिरेमठ, राजशेखर बुरकुले, विद्यानंद स्वामी, चिदानंद मुस्तारे, सचिन विभुते उपस्थित होते.

### खासगी...

भूमिका राज्य शासनाची होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी आरटीई शाळांच्या नियमांत सरकारने बदल केले होते. परंतु हा अध्यादेश चुकीचा असून पालकांना त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी पसंतीच्या शाळेत प्रवेश घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. या अधिकारावर सरकार गदा आणू शकत नाही असे हायकोर्टाने म्हटले आहे.

### गडकिल्लयांवर...

विरोधकांना खडसावले. महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे, माझी लाडकी बहिण योजना आपण दिलेली आहे. पण काहीना काही टीका करण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत. मध्ये म्हणायचे बहिणीला दिले भावाला काही दीले नाही असा टोला देखील अजित पवारांनी विरोधकांना लगावला. यासोबतच किल्लयावर दारू पिऊन जाणा-यांविरोधात कडक कायदा केला जाणार आहे असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

## २३ सुवर्णपदकं आणि ३९ वर्ल्ड रेकॉर्ड कोण आहे ऑलिम्पिकच्या इतिहासातील सर्वात यशस्वी खेळाडू?

ऑलिम्पिक २०२४ पॅरिस येथे होणार आहे. ऑलिम्पिकच्या इतिहासात भारताने आतापर्यंत केवळ १० सुवर्णपदके जिंकली आहेत, परंतु जगात एक असा खेळाडू आहे ज्याने केवळ ऑलिम्पिकमध्ये २३ सुवर्णपदके जिंकली आहेत.पॅरिस ऑलिम्पिक येत्या २६ जुलैपासून सुरू होत आहे. जगभरातील करोडो क्रीडाप्रेमी या मोठ्या स्पर्धे साठी उत्सुक आहेत. भारताने आतापर्यंत १० सुवर्णपदके भार- ताने जिंकली आहेत, यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये या आकड्यात भर घालण्याचा प्रयत्न भारतीय खेळाडू करणार आहेत. ऑलिम्पिकमध्ये जगभरातील अनेक विविध खेळाडू सहभागी होत असतात. तर अशा एका खेळाडूबद्दल आज जाणून घेऊया, ज्याने ऑलिम्पिक इतिहासात सर्वाधिक पदके जिंकली आहेत.

# जिच्या एका स्माइलने चाहते घायाळ होता, ती नॅशनल क्रश कोणाला करतेय डेट?

**नवी दिल्ली:**स्मृती मानधना तिच्या फलंदाजी आणि लूकमुळे नेहमीच चर्चे त असते. आज स्मृती तिचा २८ वा वाढदिवस साजरा करत आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाची सलामीवीर स्मृती मानधना आज तिचा २८ वा वाढदिवस साजरा करत आहे. स्मृती नेहमीच तिच्या फलंदाजी आणि लूकमुळे चाहत्यांच्या मनावर राज्य करते. क्रिकेटच्या मैदानावर मानधना जितकी तिच्या स्फोटक फलंदाजीसाठी प्रसिद्ध आहे, तितकीच ती मैदानाबाहेर सोशल मीडियावरही तितकीच लोकप्रिय आहे. ज्यामुळे तिचे चाहते तिला नॅशनल क्रश' असेही म्हणतात. तिचं वैयक्तिक आयुष्यही चर्चेत असतं.

अशा परिस्थितीत स्मृती मानधना ज्या व्यक्तीला डेट करत आहे ती कोण आहे हे तुम्हाला माहीत आहे का?

स्मृती मानधना कोणाला डेट करते?

स्मृती मानधना पलाश मुच्छलबरोबर डेटिंग करत असल्याच्या चर्चा सुरू आहेत. पलाश हा प्रसिद्ध बॉलिवूड गायिका पलक मुच्छलचा भाऊ आहे. स्मृती आणि पलाश अनेकदा एकत्र स्पॉट झाले आहेत. दोघेही एकमेकांचा वाढदिवस एकत्र साजरा करतात. पलाश हा इंदूरचा रहिवासी असून स्मृती त्याच्याशीच लग्न करू शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे. स्मृतीची सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटूसाठी निवड झाल्यानंतर लगेचच पलाश मुच्छलने इंस्टाग्रामवर तिच्यासाठी एक खास गोष्ट पोस्ट करून तिचे अभिनंदन केले होते.पलाशने एका सार्वजनिक कार्यक्रमात स्मृतीबद्दलचे प्रेम व्यक्त केल्याचे अनेक रिपोर्ट्समध्ये सांगण्यात आले होते. पलाशने स्मृतीला बहिणीसमोर प्रपोज केले होते, त्यानंतर त्यांच्या नात्याची चर्चा आणखी वाढली होती. त्याच वेळी, नुकतेच पलाशने मंधानासह केक कापतानाचे दोन फोटो शेअर केले होते, ज्यात त्याने कॅप्शनमध्ये हॅशटॅग ५ लिहिले होते आणि हार्टचा इमोजी शेअर केला होता. ज्यावरुन दोघे ५ वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये असल्याचा अंदाज जात आहे. मात्र, या दोन्ही सेलिब्रिटींनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.हेही वाचा - चडउ २०२४ : धक्कादायक! वेगवान चेंडूने गोलंदाज रक्तबंबाळ; तखअ्ज पाहून चाहत्यांना फिलीप ह्यूजची आली आठवणस्मृती मानधनाचा आतापर्यंतची कारकीर्द -स्मृती मानधनाचा क्रिकेट कारकिर्दीबद्दल बोलायचे तर, तिने भारतीय महिला संघासाठी ७ कसोटी सामने खेळताना ६२९ धावा केल्या आहेत, ज्यात २ शतके आणि ३ अर्धशतकांचा समावेश आहे. त्याचवेळी, एकदिवसीय क्रिकेटमध्ये तिने ८५ सामने खेळताना ३५८५ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये ७ शतके आणि २७ अर्धशतकांचा समावेश आहे. तिने १३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३३२० धावा केल्या आहेत.


**CHANGEOFNAME**
**DECLARATION**

It is to declare that, my name on this passport of my son AGRAWAL ANILKUMAR SHRIKISHAN is written and on other document of mine my name AGRAWAL ANIL SHRIKISHAN is this. Hence in future in my business this will be the name.

**Old Name**: AGRAWAL ANILKUMAR SHRIKISHAN
**New Name**: AGRAWAL ANIL SHRIKISHAN
**ADDRESS**
RADHE RADHE E-14 MIDC OLD MIDC, LATUR, LATUR PIN-413531

**टी. सी. हरवली आहे**

निकिता निळकंठ कदम या नावाची श्री महेश कनिष्ठ महाविद्यालय शिरूर ताजबंद ता. अहमदपूर येथील बारावी पास टी. सी. व मार्क मेमो शिरूर ताजबंद ते लातूर प्रवासात हरवली आहे. सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

**मोबाईल नंबर-९४२१३७८४८९**

**टी. सी. हरवले आहे**

अश्विनी तानाजी मुंडे.रा. वांगदरी. या नावाची इयत्ता १२ वी. बारावीची टी. सी. श्री सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय रामेश्वर तालुका लातूर. जिल्हा लातूर या शाळेची वांगदरी ते लातूर बस प्रवासात हरवली आहे कोणाला सापडल्यास खालीले क्रमांकावर संपर्क करावा

**मोबाईल नंबर-८८०६१०९२०९**

**टी. सी. हरवली आहे**

सूक्ष्म ज्ञानोबा चीपुरे राहणार ऊजना तालुका अहमदपूर जिल्हा लातूर या नावाची श्री संत सद्गरु विद्यालय उजना या शाळेची इयत्ता नववी ९ वी. पासची टी..सी. उजना ते अहमदपूर बसने प्रवास करत असताना हरवली आहे हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

**मो.नं.८८८८२७५६५४**

**CHANGEOFNAME**
**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGEING MY NAME WHICH WAS EARLIER : SAYYAD SAYAMA NAIM TO : SAYAMA NAIM SAYYED HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SAYAMA NAIM SAYYED IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BYMY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLDNAME:-** SAYYAD SAYAMA NAIM
**NEWNAME:-** SAYAMA NAIM SAYYED
**ADDRESS:-** GANDHI NAGAR UDGIR.LATUR M/S

**CHANGE OF NAME**
**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGEING MY NAME WHICH WAS EARLIER : MOHAMMED SAYEED UL HAQUETO : MOHAMMED SAEEDUL HAQUE MOHAMMED ABDUL GAFOOR QURESHI HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE MOHAMMED SAEEDUL HAQUE MOHAMMED ABDUL GAFOOR QURESHI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BYMY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME**
MOHAMMED SAYEED UL HAQUE
**NEW NAME**
MOHAMMED SAEEDUL HAQUE MOHAMMED ABDUL GAFOOR QURESHI
**ADDRESS**
QURESHI COLONY DABIRPURA UDGIR.LATURM/S

**CHANGE OF NAME**
**DECLARATION**

It is to declare that, my name on this passport AGRAWAL AKASH is written and on other document of mine my name AGRAWAL AKASH ANIL is this. Hence in future in my business this will be the name.

**Old Name**: AGRAWAL AKASH ANIL
**New Name**: AGRAWAL AKASH ANIL
**ADDRESS**
ANNAPURNA, UDYOG, PLOT NO. E-13, M.I.D.C., LATUR PIN-413531

**CHANGEOFNAME**
**DECLARATION**

It is to declare that, my name on this passport of my son AGRAWAL LEELA ANILKUMAR is written and on other document of mine my name AGRAWAL LEELA ANIL is this. Hence in future in my business this will be the name.

**Old Name**: AGRAWAL LEELA ANILKUMAR
**New Name**: AGRAWAL LEELA ANIL
**ADDRESS**
RADHE RADHE E-14 MIDC OLD MIDC, LATUR, LATUR PIN-413531

**कल्याण बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

**मिलन नाईट बाजार**

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

९% आवर्त ठेव द.सा.द.शे, 0.५0% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.

# यशवंत

शनिवार दि. २० जुलै २०२४



# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग

# मतदारसंघातील ४० कि.मी. च्या रस्त्यांसाठी ४९ कोटींचा निधी



**उदगीर (प्रतिनिधी)** ग्रामीण भागातील नागरिकांना उदगीर व जळकोट तालुक्याला येण्यासाठी दर्जेदार रस्ते निर्माण व्हावे यासाठी या भागाचे आमदार तथा राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे प्रयत्नशील होते. ना. संजय बनसोडे यांच्या प्रयत्नाने उदगीर व जळकोटतालुक्यातील ४० कि.मी. ४९ कोटी ६ लक्ष ९६ हजार महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकासविभागाअंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा - २ ( बॅच - १) संशोधन व विकास अंतर्गत लातूर जिल्ह्यातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

यामध्ये उदगीर तालुक्यातील कोळनुर - करंजी - विराळ ते कुणकी रस्ता ( ODR - ५१ ) या ५ कि.मी. रस्त्यासाठी ६ कोटी ९९ लक्ष रु., रामा - २५१ ते डोम गाव ते हावरगा रस्ता ( तठ - १२ ) ३.९ कि.मी. साठी ४ कोटी ७७ लक्ष रु., राज्यमार्ग २५१ ते वांजरवाडा - होकर्णा - उमरदरा ते जिल्हा सरहद्द रस्ता ( ODR - ४८ ) ५.४ कि.मी. साठी ९ कोटी ४४ लक्ष, मौ.लोहारा - भाकसखेडा - चिघळी - करखेली ते प्रजिमा - २४ रस्ता ( LR - ४७, ODR - ६७) १०.६ कि.मी. साठी ११ कोटी ९४ लक्ष रु, मौ.तोंडार ते तोंडारसाखरकारखाना पाटीपर्यंत रस्ता ( LR - ६३, VR - ३८ ) २.३ कि.मी. साठी ३ कोटी ९९ लक्ष, रामा - २६८ ते मेवापुर ते जिल्हा सरहद्द रस्ता ( LR - १४ , VR - ५३, ODR - ५५ ) ४.२ कि.मी. साठी ५ कोटी ७४ लक्ष, मौ.वायगाव ते पश्चिम भाकसखेडा रस्ता ( ODR - ६९ ) ४.१ कि.मी. साठी ४ कोटी ७९ लक्ष रु., राममा- ५० नावंदी ते डोंगरशेळकी रस्ता ( ODR - ५० ) ४.४ कि.मी. रस्त्यासाठी ६ कोटी १६ लक्ष रु., अशा एकुण ८ रस्त्यांसाठी ४९ कोटी ६ लक्ष ९६ हजार रूपयाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील सदर रस्त्यांना मंजुरी दिल्याबद्दल या भागातील नागरिकांनी क्रीडामंत्री संजय बनसोडेयांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहेत.

ग्रामविकास विभागातून उदगीर मतदार संघातील रस्त्यांना निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने
## खा. डॉ. शिवाजी काळगे, खा. धैर्यशिल मोहिते पाटील, खा. सागर खंडू यांचा आज सत्कार सोहळा





**उदगीर (प्रतिनिधी)** किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने उद्या दि. २० जुलै २०२४ रोजी सायंकाळी चार वाजता शिवाजीमहाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये भव्य सहृदय सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सोहळ्याच्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीपराव देशमुख माजी मंत्री महाराष्ट्र राज्य हे असणार आहे. यावेळी माढाचे नवनिर्वाचित खासदार धैर्यशील राजसिंह मोहिते पाटील, लातूरचे नवनिर्वाचित खासदार शिवाजीराव बंडप्पा काळगे, बिदरचे नवनिर्वाचित खासदार सागर ईश्वर खंडरे यांचा सहृदय सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मणराव मोरे व्हाईस चेअरमन जागृती शुगर्स तळेगाव, सौ शीतलदेवी धैर्यशील मोहिते पाटील यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर हे असणार आहेत. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव किशनराव पाटील ,सचिव पांडुरंग तुळशीराम शिंदे, सहसचिव हिरागीर सिद्धगीर गिरी,कोषाध्यक्ष गुंडेराव भाऊराव पाटील, कार्यकारणी सदस्य ज्ञानदेव रामभाऊ झोडगे, रामराव नारायण एकंबे, काकासाहेब गोविंदराव पाटील, भीमराव नरसिंगराव पाटील यांनी केले आहे. कार्यक्रमाचे नियोजन पृथ्वीराज पाटील एकंबेकर व त्यांचे मित्रपरिवार करत आहेत.

# साकोळकर विद्यालयात ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते प्राचार्य भालके शिवराज यांचा सत्कार......



**उदगीर (प्रतिनिधी)** देवर्जन येथील गंगाधरराव साकोळकर पाटील मा.आणि उच्च मा.विद्यालयाचे मु.अ / प्राचार्य शिवराज भालके हे आपल्या प्रदीर्घ सेवेतून दि.३० जून २०२४ रोजी सेवा निव्रत झाले आहेत. त्यानिमित्याने संस्थेच्या आणी विद्यालयाच्या वतीने दि. १८ जुलै २०२४ रोजी ठीक ११.०० वाजता प्राचार्य शिवराज भालके आणी प्रा. ऊी श्रीमती सुलभा साकोळकर यांचा मा. क्रीडामंत्री संजय बनसोडे साहेब यांच्या हस्ते भव्य सत्कार पार पडला .या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शिवाजीराव साकोळकर होते. सुरुवातीस राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे साहेब यांनी साकोळकर क्रीडा संकुलावरील २०० मी. चा ठींपपळपस ढीरलज्ञ चे उदघाटन केले .कार्यक्रमांस प्रमुख पाहुणे म्हणून सचिव प्रा. ओमप्रकाश साकोळकर साहेब,सरपंच अभिजित साकोळकर,संस्थेचे उपाध्यक्ष मनोजभाऊ साकोळकर,संस्थेचे डायरेक्टर नारायणराव रोडगे सर,माजी सभापती मुन्ना पाटील, क्रीडा अधिकारी जग्गनाथ लकडे साहेब, सुरडकर साहेब,मुकदम साहेब, उमेश पाटील, दयानंद रोडगे, सोनटक्के साहेब, राठोड सर उपस्थित होते. प्रस्ताविक शाळेचे मु. अ.शिरूरे सरांनी शाळेंची सुरुवातीपासून ते आतापर्यंत शाळेच्या प्रगतीचा आढावा सांगितला. त्यानंतर शिवाजीराव साकोळकर पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रा. ओमप्रकाश साकोळकर साहेब यांनी प्राचार्य भालके यांच्या शैक्षणिक कार्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. संजय बनसोडे साहेब यांनी मतदार संघात विविध विकास कामे मोठया प्रमाणात केले असल्यामुळे त्यांचे विकास पुरुष असे वर्णन केले. क्रीडामंत्री बनसोडे साहेब यांनी साकोळकर साहेबांनी क्रीडा संकुल साठी तीन एकर जमीन दिल्यामुळे मी या क्रीडा संकुल मध्ये इनडोअर स्टेडियम बनवन्यासाठी दीड कोटी निधी जाहीर केला. शेवटी त्यांनी प्राचार्य शिवराज भालके आणी प्रा. डॉ सुलभा साकोळकर यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.नंतर प्राचार्य शिवराज भालके साहेब यांनी सुरुवातीपासून आपल्या गरिबी परिस्थिती सोबत कसा संघर्ष करून यश संपादन केले हे आपल्या मनोगतात व्यक्त केले आणी मला या शाळेत सर्वांचे प्रेम मिळाले असे सांगत असताना भावना विवेश झाले.या कार्यक्रमांस देवर्जन पंचक्रोशीतील सर्व सरपंच, पोलीस पाटील,पालक, परिसरातील शाळेतील सर्व मु. अ.,शिक्षक आणी शिक्षकेत्तर कर्मचारी आणी विद्यार्थी उपस्थित होते . कार्यक्रमानंतर सर्वानी स्नेह भोजनाचा लाभ घेतला .कार्यक्रमाचे संचलन अतिशय सुरेख आणी सुंदर पद्धतीने प्रा डी. पी. कांबळे आणी येलमटे मॅडम यांनी केले. शेवटी पर्यवेक्षक कांबळे सरांनी सर्वांचे आभार मांडले.

# पात्र महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा - ना. संजय बनसोडे



**जळकोट (माधव होनराव)** वांजरवाडा येथील श्री संत गोविंद माऊली मंदिरात प्रशासनाच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण जनजागृती उपक्रमात कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते अर्ज वितरण करण्यात आले.

या प्रसंगी कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे, भानुदास महाराज पुजारी, सरपंच अविनाश नळंदवार, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संग्राम पाटील, बाजार समितीचे सभापती विठ्ठल चव्हाण, पंडितराव सूर्यवंशी,जळकोटच्या नगराध्यक्षा प्रभावती कांबळे, ॲड. तात्या पाटील, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष विनायक जाधव, गजानन दळवे, खादर लाटवाले, विनोद गुरमे, संभाजी गोरखे, जिल्हा परिषदेच्या माजी बालकल्याण सभापती लक्ष्मीबाई गोरखे, माधव शिवणगे, गोविंद भ्रमन्ना, प्रकाश पवार,पाशाभाई शेख, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार सुरेखा स्वामी, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, प्रकल्प अधिकारी श्रीमती नादरगे, ग्रामविकास अधिकारी संजय जाधव आदि उपस्थित होते.

यावेळी कॅबिनेट मंत्री बनसोडे यांनी पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. तर या योजनेची सविस्तर माहिती आपल्या भाषणातून उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांनी दिली. प्रास्ताविक सरपंच अविनाश नळंदवार यांनी तर सूत्रसंचालन पत्रकार विवेक पोतदार यांनी केले.

**✻तापमान✻**
✻दि.२०/०७/२०२४
कमाल तापमान-२७.३ से.
किमान तापमान२२.५.से
✻आर्द्रता - ८५%✻
पर्जन्य - २० %
✻शरिर क्रिया विभाग
पशुवैद्दकिय उदगीर

# पुणे येथे उदयास आले उगवते उदगीरकर उदगीरचे माजी विद्यार्थी पुणे, मुंबईत एकवटले



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर शहरातील श्यामलाल विद्यालयाचे विद्यार्थी प्रिय मुख्याध्यापक राम पांडुरंग माने यांनी आपली ३९ वर्षे सेवा बजावून सन २००५ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर पुणे येथे स्थायिक होत तेथे त्यांनी वयाच्या सत्याहत्तरीत ङ्गउगवते उदगीरकरङ्घ या नावाने उदगीर व परिसरातील त्यांच्याकडून शिक्षण घेतलेले जे विद्यार्थी पुणे व मुंबई शहरात सेवा बजावणारे व वास्तव्यास असलेल्या त्यांचे माजी विद्यार्थ्यांना एकत्रितपणे संपर्कात घेतले आहेत.

उदगीर शहासह परिसरातील माजी विद्यार्थी पुणे व मुंबई येथे आयुक्त, उपायुक्त, आय.ए.एस., आर.टी.ओ., डॉक्टर, अभियंता, उद्योजक, विविध उच्च पदस्थ अधिकारी, व विविध क्षेत्रात कार्यरत असलेले असे एकुण ३०० ते ३५० माजी विद्यार्थी एकत्रितपणे येत राम माने गुरुजींच्या अध्यक्षतेखाली वाल्हे (पुणे) येथे बैठक घेण्यात आली. पुणे येथे ङ्गउगवते उदगीरकरङ्घ हा ग्रुप सामाजिक, शैक्षणिक, व आपल्या भागातील नागरिकांच्या समाजोपयोगीकार्यासाठी जिव्हाळा जपणारा हा ग्रुप उदयास आला आहे.

पुणे जवळ असलेल्या वाल्हे येथे ङ्गउगवते उदगीरकरङ्घ हा ग्रुप सर्वोतोपरी सहकार्यातून एक शैक्षणिक संस्था स्थापन करण्याच्यादृष्टीने हालचाली गतीमान केल्या असून या शैक्षणिक संस्थेसाठी रामचंद्रराव दुर्गाडे यांनी वाल्हे येथे एक एक्कर जमीन देणार असल्याचे जाहीर केले. असून शैक्षणिक संस्थेच्या विस्तारासाठी ङ्गउगवते उदगीरकरङ्घ ग्रुप मधील माजी विद्यार्थी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे ठरवले आहे.

मुंबई व पुण्यातील माजी विद्यार्थी मित्र वाल्हे येथे एकत्रीत येत एका बैठकीचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. त्यात अनेकांनी सर्वोतोपरीसहकार्यकरून त्या जागी शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे ठरवले. त्यावेळी रामचंद्र दुर्गाडे यांनी, ङ्गउदगीर परिसरातील अनेक मित्र वाल्हे गावातील मुलांसाठी जी शैक्षणिक संस्था स्थापन करत आहेत ही बाब नक्कीच राष्ट्रीय एकात्मता, माणूस जोडणारा कृती ठरेल. असे मत व्यक्त केले आहे.

सचिन दुर्गाडे, व मुंबई हायकोर्टाचे ॲड. बापू नेवासे, आरटीओ रमेश कल्लूरकर, उपायुक्त नंदकुमार पाटील, ग्रंथमित्र दिपक बलसुरकर, पोलीस निरीक्षक शिवशंकर मोरे, सतीश डोईजोडे, जमील परकोटे, सुचिता वर्धमाने, बी.एस.माने यांच्या सह शेकडो माजी विद्यार्थी उपस्थित होते. ङ्गउगवते उदगीरकरङ्घ या कार्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभत आहे... आपण सर्व आहात म्हणून मी आहे. तरी माझ्या सोबत रहा. आपण काही तरी चांगले करू या, ङ्गअशी इच्छा व्यक्त करत आर पी माने सरांनी सर्वांचे आभार मानले.

मुंबईतील उदगीरकर, पुणे येथे उगवते उदगीरकर.. मी विद्यार्थी प्रिय मुख्याध्यापक असल्याने माझे सोबत शेकडो विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याची नाळ जुळलेली आहे. माझे शेकडो माजी विद्यार्थी मुंबई, पुणे येथे उच्च पदावर सेवा बजावतात तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करतात. या सर्वांचा सतत संपर्क व्हावा व एकमेकांना व एकमेकांच्या ओळखीच्या आणि आपल्या भागातील लोकांची कामे कमी खर्च व कमी वेळात व्हावी म्हणून मुंबई येथे ङ्गमुंबईतील उदगीरकरङ्घ आणि पुणे येथे ङ्गउगवते उदगीरकरङ्घ असे ग्रुप तयार करुन आपल्या भागातील सर्वजण एकत्र येऊन एकमेकांची अनेक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.